cmyk

## संपादकीय

### होर्मुजची कोंडी आणि महासत्तांची कसोटी...

इराण-इस्त्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारण एका नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धाची आक्रमक भूमिका घेत संपूर्ण जगाला अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलले, मात्र आज त्याच धोरणांची मर्यादा उघड होताना दिसत आहे. सुरुवातीला काही दिवसांत निर्णायक विजय मिळवण्याचा दावा करणाऱ्या अमेरिकेला आता इराणच्या कठोर प्रतिकारामुळे वास्तवाचे भान येऊ लागले आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–२ | शुक्रवार दि.२० मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# राज्यात पिकांवर रोगराईचा प्रभाव; मोठे नुकसान नसल्याचा कृषिमंत्र्यांचा दावा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील काही जिल्ह्यांत नैसर्गिक आपत्ती, बदलते हवामान आणि रोगराईमुळे पिकांवर परिणाम झाल्याचे समोर आले असले, तरी मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या बातम्या अतिशयोक्त असल्याचा खुलासा राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत केला आहे.**



बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, परभणी आणि नाशिक या जिल्ह्यांत तूर, ज्वारी, हळद, कांदा, मका, गहू आदी पिकांवर किडी व रोगांचा काही प्रमाणात प्रादुर्भाव आढळला होता. विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तूर पिकावर 'मर' रोग व ज्वारीवर लष्करी अळीचा अल्प प्रमाणात परिणाम दिसून आला. अतिवृष्टीमुळे तुरीची सुरुवातीची वाढ खुंटली असली, तरी नंतरच्या अनुकूल वातावरणामुळे उत्पादनावर मोठा परिणाम झालेला नाही, असे भरणे यांनी स्पष्ट केले. परभणी जिल्ह्यातील काही सखल भागात हळद पिकावर करपा रोगाचा मर्यादित प्रादुर्भाव दिसून आला, मात्र तो आर्थिक नुकसानीच्या पातळीखाली असल्याचे त्यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्यात कांदा पिकावर शेंडे जळण्याचा अल्प प्रमाणात परिणाम दिसून आला होता, पण सध्याची परिस्थिती नियंत्रणात असल्याचेही त्यांनी नमूद केले. मका व गहू पिकांवर कोणताही गंभीर प्रादुर्भाव नसल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात हरभरा पिकावर 'घाटे अळी'चा प्रादुर्भाव आढळून आल्याने कृषी विभागाने तातडीने उपाययोजना केल्या आहेत. शेती शाळा, गाव बैठका, शास्त्रज्ञांच्या भेटी तसेच जनजागृती मोहिमेद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे कृषिमंत्र्यांनी सांगितले. नाशिक जिल्ह्यात जैविक बुरशीनाशके व ट्रायकोडर्मा यांसारखी औषधे उपलब्ध करून देण्यात आल्याने परिस्थिती आटोक्यात आणण्यात यश आले आहे. तसेच 'क्रॉपसॅप' ▶▶ पान २ वर



## दैनिक राज्य लोकतंत्रचा पाचवा वर्धापन दिन उत्साहात साजरा !

### प्रतिष्ठितांसह शेतकरी आणि सामान्य वाचकांचा भरभरून प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

**राज्यस्तरीय ओळख निर्माण केलेल्या दैनिक राज्य लोकतंत्रच्या बीड आवृत्तीचा पाचवा वर्धापन दिन गुढीपाडवा या शुभ मुहूर्तावर, १९ मार्च रोजी, अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवर, शेतकरी बांधव आणि सर्वसामान्य वाचकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दैनिकाविषयीचा विश्वास आणि आपुलकी व्यक्त केली.**

कार्यक्रमाचे आयोजन शहरातील प्रसिद्ध ग्रँड यशोदा येथील भव्य लॉनवर करण्यात आले होते. सुबक नियोजन, आकर्षक सजावट आणि आपुलकीच्या वातावरणामुळे कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. उपस्थित मान्यवरांनी एकमेकांशी संवाद साधत दैनिकाच्या वाटचालीचा आढावा घेतला. या कार्यक्रमाला दैनिकाचे व्यवस्थापकीय संचालक व संपादक गणेश मोकाशे, कार्यकारी संपादक सुभाष चौरे, मुख्य उपसंपादक अनिल जाधव, उपसंपादक विशाल सोळंके, व्यवस्थापक दिलीप शिंगाडे, तंत्रज्ञ आप्पासाहेब महानोर, अमोल शिंदे, नागेश क्षीरसागर यांच्यासह इतर सहकारी मोठ्या उत्साहात उपस्थित होते. सर्वांनी एकत्रितपणे वर्धापन दिनाचा केक कापून आनंद साजरा केला. दैनिक राज्य लोकतंत्र हे सुरुवातीपासूनच कृषी विषयांना प्राधान्य देणारे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे ▶▶ पान २ वर

## ६८ लाखांचे इनाम असलेल्या ११ नक्षल्यांचे पोलिसांपुढे आत्मसमर्पण

गडचिरोली । प्रतिनिधी

विविध दलममध्ये कार्यरत ११ जहाल नक्षल्यांनी आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. त्यात १ विभागीय समिती सदस्य, एक क्षेत्र समिती सचिव, एक प्लाटून पार्टी सदस्य, १ कमांडर, १ क्षेत्र समिती सदस्य आणि अन्य ६ दलम सदस्यांचा समावेश आहे. पोलिसांनी त्यांच्यावर एकूण ६८ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर होतं.

सोनी उर्फ बाली वत्ते मट्टामी, बुदरी उर्फ रामबत्ती आयतू मट्टामी, सुखलाल बोळगा कोक्सा, शांती उर्फ सोमरी गंगा तेलामी, यमुनक्का उर्फ रुखमाक्का पेंदाम, गणेश कोवासी, मिनको उर्फ जमनी काऱ्या ▶▶ पान २ वर

## बीडमध्ये शेतात गांजाची लागवड २२ किलो गांज्यासह महिला अटकेत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील लोणवळ गावात पोलिसांनी एका शेतावर धाड टाकून गांजाची अवैध शेती उद्ध्वस्त केली आहे. या कारवाईत सुमारे २१ किलो ९६० ग्रॅम वजनाचा ओला गांजा जप्त करण्यात आला असून, याप्रकरणी शेतमालक महिलेला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. जप्त केलेल्या गांजाची बाजारपेठेत किंमत सुमारे ५.४९ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वडवणी तालुक्यातील लोणवळ येथील एका शेतात व्यावसायिक ▶▶ पान २ वर

### सुटीची सुचना

**आज दि.२० मार्च २०२६ रोजी दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास वर्धापनदिनाच्या निमित्ताने सुटी असल्याने, उद्या दि.२१ मार्च २०२६ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व एजंट यांनी नोंद घ्यावी.**

–व्यवस्थापक












cmyk

अग्रलेख

# होर्मुजची कोंडी आणि महासत्तांची कसोटी...

इराण–इस्त्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारण एका नव्या वळणावर येऊन ठेपले आहे. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धाची आक्रमक भूमिका घेत संपूर्ण जगाला अनिश्चिततेच्या गर्तेत ढकलले, मात्र आज त्याच धोरणांची मर्यादा उघड होताना दिसत आहे. सुरुवातीला काही दिवसांत निर्णायक विजय मिळवण्याचा दावा करणाऱ्या अमेरिकेला आता इराणच्या कठोर प्रतिकारामुळे वास्तवाचे भान येऊ लागले आहे.

इराणने पारंपरिक युद्धतंत्राऐवजी आर्थिक आणि सामरिक दडपशाहीचे शस्त्र वापरले आहे. होर्मुज सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची सागरी जलवाहिनी बंद करून त्यांनी जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा पकडला आहे. पर्शियन आखात आणि ओमानच्या आखाताला जोडणारा हा अरुंद मार्ग जगातील जवळपास २० टक्के खनिज तेल वाहतुकीसाठी अत्यावश्यक आहे. या मार्गावर नियंत्रण मिळवत इराणने युद्धाचे समीकरण पूर्णपणे बदलून टाकले आहे.

अमेरिका आणि तिचे पारंपरिक मित्रदेश यांना या परिस्थितीत अपेक्षित प्रतिसाद देण्यात अपयश आले आहे. नाटो देशांमध्ये एकजूट दिसून न आल्याने अमेरिकेची कोंडी अधिकच वाढली आहे. ऑस्ट्रेलिया, जपान यांसारख्या देशांनी स्पष्टपणे दूर राहण्याचा निर्णय घेतला, तर युरोपियन देशांनीही या संघर्षात ओढले जाण्याबाबत अनास्था दाखवली. यामुळे अमेरिकेच्या जागतिक नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखालील चीनने या परिस्थितीकडे धोरणात्मक संधी म्हणून पाहिले आहे. इराणसोबतचे संबंध दृढ करताना चीनने थेट संघर्ष टाळण्याचा मार्ग स्वीकारला आहे. भारतासारख्या देशांनाही इराणने मर्यादित सवलती देत आपल्याकडे झुकवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे हा संघर्ष केवळ लष्करी न राहता तो जागतिक सत्तासंतुलनाचा खेळ बनला आहे. भारतासाठी ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारताला होर्मुजमधील अडथळ्यांचा थेट फटका बसत आहे. औद्योगिक उत्पादनावर परिणाम, इंधन दरवाढ आणि रोजगारावर होणारा परिणाम यामुळे आर्थिक संकटाची चिन्हे दिसू लागली आहेत. अशा वेळी भारताने संतुलित परराष्ट्र धोरण राखत स्वतःच्या हितांचे संरक्षण करणे ही मोठी कसोटी ठरणार आहे. या संघर्षात बिन्यामीन नेत्यानाहू यांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. इस्रायलच्या सुरक्षेच्या नावाखाली आक्रमक धोरण स्वीकारले असले तरी दीर्घकालीन परिणामांचा विचार केला तर हा मार्ग धोकादायक ठरू शकतो. अमेरिकेच्या पाठिंब्यावर अवलंबून राहणाऱ्या इस्रायललाही आता एकट्याने निर्णय घेण्याची वेळ येत आहे.

युद्ध जितके लांबते आहे तितकी त्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता अधिक आहे. मध्यपूर्वेतील हा संघर्ष जर व्यापक झाला, तर त्याचे परिणाम केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित राहणार नाहीत. जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा बाजारपेठ, तसेच आंतरराष्ट्रीय संबंध यावर त्याचे दूरगामी परिणाम होणार आहेत. सध्याची परिस्थिती पाहता, कोणत्याही बाजूला पूर्ण विजय मिळण्याची शक्यता क्षीण आहे. अशा वेळी राजनैतिक तोडगा हाच एकमेव पर्याय उरतो. मात्र परस्पर अविश्वास, अहंकार आणि सत्तास्पर्धा यामुळे तोडगा निघणे कठीण होत आहे. मानवजातीच्या दृष्टीने हा संघर्ष केवळ दोन देशांमधील युद्ध नसून तो जागतिक स्थैर्याची परीक्षा आहे. महासत्तांनी आपल्या अहंकाराला आवर घालत संवादाचा मार्ग स्वीकारला, तरच या संकटातून मार्ग निघू शकतो. अन्यथा होर्मुजची कोंडी ही केवळ सुरुवात ठरेल आणि जग एका मोठ्या संकटाकडे वाटचाल करू लागेल.


# विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खासबाग जयंती उत्सव समितीची कार्यकारणी जाहीर

## अध्यक्षपदी आतिष वडमारे; सचिवपदी प्रतिक भोले, उपाध्यक्षपदी विशाल वडमारे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

**नालंदा बुद्ध विहार येथे अरुण भोले (अण्णा) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीचे प्रास्ताविक संतोष निकाळजे यांनी केले. बैठकीदरम्यान विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, सर्वानुमते विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खासबाग जयंती उत्सव समितीची नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवासाठी अध्यक्षपदी आतिष वडमारे, सचिवपदी प्रतिक भोले आणि उपाध्यक्षपदी विशाल वडमारे यांची निवड करण्यात आली.**

अध्यक्ष: आतिष वडमारे, उपाध्यक्ष: विशाल वडमारे, संदीप चांदणे, सचिव: प्रतिक भोले, सहसचिव: प्रदीप वीर, सनी शिंदे, कोषाध्यक्ष: प्रकाश कदम, संतोष चक्रे / बबलू ओव्हाळ, सहकोषाध्यक्ष: रोहित भोले, अनिकेत वडमारे, सागर जावळे,.



संघटक: विशाल (पप्पू) वडमारे, कुणाल बोराडे, सहसंघटक: अजय साळवे, ब्रिजेश वडमारे, विशाल बोराडे, प्रसिद्धी प्रमुख: प्रवीण वडमारे, महादेव भालेराव, संरक्षण प्रमुख: रोहन डोंगरे, अनुप दळवी, शैलेश बोराडे, कार्याध्यक्ष: रवी धुरंधरे, साहिल वडमारे, हर्ष वाघमारे, सहकार्याध्यक्ष: सतिश सौंदरमल, मंगेश शिंदे, स्वागताध्यक्ष: श्रावण बोराडे, स्वप्निल जावळे, व्यवस्थापक: गणेश दळवी, सोनू गायकवाड, सुशांत जावळे, अक्षय वडमारे, सिद्धांत सरपते, संघर्ष वडमारे, आदित्य गवळी, मार्गदर्शक: दिनकर बोराडे, अरुण भोले, हनुमंत वाघमारे, बंडू दळवी, मारोती शिंदे, मोहन जावळे, राजू डोंगरे, संजय जाधव, मिलिंद भोले, तुकाराम वडमारे, ॲड. नितीन वाघमारे, संतोष (बाळू) वडमारे, अनिल डोळस, श्रीरंग वडमारे, शहादेव चक्रे, संतोष निकाळजे, शैलेश जोगदंड, विकास सरवदे, अशोक दळवी, संतोष गायकवाड, मनोज वीर. या बैठकीस मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांमध्ये विकास वडमारे, महेंद्र वीर, किरण बोराडे, नितीन कांडेकर, प्रकाश दळवी, रोहित डोंगरे, सुजीत जावळे, संघराज बोराडे, सिद्धांत वडमारे, धम्मजीत जावळे, रविराज बोराडे, अतुल वडमारे, स्वप्निल जावळे, गजानन निकाळजे, अमोल हराळे, शशिकांत जाधव, बाळू इंगळे, बाळू बोराडे, दादा वडमारे, प्रमोद चक्रे, रितेश कांडेकर, बाळकृष्ण गायकवाड, ईश्वर वाघमारे, संकेत वडमारे, सिद्धार्थ सौंदरमल, कुणाल वाघमारे, मनोज दळवी, रोहन गायकवाड, कुणाल जाधव, सुजल जाधव, सुबोध जावळे, सुरज बोराडे, संस्कार सौंदरमल, मयूर भालेराव यांचा समावेश होता. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य–दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# हरवलले, चोरीस गेलेले १७ मोबाईल पोलिसांनी तपास लावून केले परत

**जालना । प्रतिनिधी**

**परतूर तालुक्यातील हरवलेल्या आणि चोरीस गेलेल्या मोबाईलचा परतूर पोलिसांनी तांत्रीक पद्धतीने शोध घेऊन मुळ मालकांना परत केले आहेत.**



केंद्र सरकारच्या दूरसंचार व दळणवळण विभागाने हरवलेल्या किंवा चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी संचारसाथी पोर्टल सुरु केले असून, या पोर्टलच्या माध्यमातून मोबाईलचा शोध घेण्यात आला. परतूर पो–लीस ठाण्यात नोंद असलेल्या तक्रारीमधुन एकुण १७ मोबाईल शोधून काढण्यात आले असून, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या हस्ते तक्रारदारांना परत करण्यात आले आहेत. नागरिकांनी आपला मोबाईल चोरी झाला किंवा हरवला असल तर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. त्यानंतर स्वतःचे आधार – कार्ड व पोलीस ठाण्याच्या फिर्याद प्रतीसह या पोर्टलचे कामकाज पाहणारे अंमलदार किरण मोरे व सुनिल पवार यांना भेटून आपली तक्रार पोर्टलवर ऑनलाईन नोंद करावी, असे आवाहन परतूर पोलिसांनी केले आहे. ही कामगिरी पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, अंमलदार किरण मोरे, सुनिल पवार, गोंविद पवार, विजय जाधव, ज्ञानेश्वर वाघ, आयटी सेलचे सागर बाविस्कर

# आझाद मैदानावर इनाम जमिनींसाठी दशनाम गोसावी समाजाचे आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**


**आझाद मैदान येथे दिनांक १७ मार्च २०२६ रोजी दशनाम गोसावी समाज, गुरव समाज, बैरागी समाज, नाथपंथी गोसावी समाज, लिंगायत समाज व ब्राह्मण समाज यांच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. इनाम जमीन वर्ग ३ ला मालकी हक्क मिळावा तसेच विविध प्रलंबित मागण्यांसाठी हे आंदोलन छेडण्यात आले.**

गुरव समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष अण्णासाहेब गुरव आणि दशनाम गोसावी समाज परिषदेचे राज्याध्यक्ष ओमप्रकाश गिरी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. महाराष्ट्रभरातून गोसावी–गुरव समाज बांधव तसेच इनामदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनात ॲड. राजेंद्र बन (संस्थापक, दशनाम गोसावी समाज परिषद बीड), महंत दत्तात्रय गिरी महाराज (जिल्हाध्यक्ष), संजय गुरव (जिल्हाध्यक्ष, बीड), कैलास गोसावी (गोसावी सेना, महाराष्ट्र) आदींनी प्रमुख भूमिका घेतली. त्यांनी इनाम जमिनींना पीक कर्ज, पिक विमा, शासकीय अनुदान व विविध शासकीय योजना लागू कराव्यात, इनाम जमिनीवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवावीत तसेच मठ–मंदिरांना संरक्षण द्यावे, अशी ठाम मागणी केली. याशिवाय विरासत कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व इनामधारकांच्या हक्कांचे संरक्षण करावे, अशीही मागणी शासनाकडे करण्यात आली. आंदोलनादरम्यान समाजाच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवून शासनाला निवेदन सादर करण्यात आले. या




वेळी राज्यभरातील प्रतिनिधी म्हणून गणेश शंकर बुवा पुरी, मुकुंद शिव गिरी (परभणी), दयानंद विठ्ठल बुवा भारती (परभणी), भगवान बाळ गिरी (पिंपरखेड, बीड), संदीप भारत पुरी (मुंबई), नवनाथ काशिनाथ पुरी (परभणी), दत्ता गोरख भारती (सातारा), किशोर अंकुश भारती (नागेशवाडी, बीड), मुकुंद कुलकर्णी, शिवाजी गणा बुवा पुरी, राजेंद्र रामराव पुरी (धाराशिव), रमेश पुरी, विलास गिरी (मुंबई), गणेश गिरी, ओम चैतन्य गिरी, सूर्यकांत गिरी (पुणे) आदी उपस्थित होते.

# बीडमध्ये हिंदू नववर्षानिमित्त पालखी मिरवणूक व शोभायात्रा उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

**हिंदू नववर्षाच्या स्वागतानिमित्त जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी संप्रदाय जिल्हा सेवा समिती, बीड यांच्या वतीने भव्य पालखी मिरवणूक व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले.**

ही मिरवणूक बालाजी मंदिर येथून सुरू होऊन सुभाष रोड, साठे चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथे उत्साहात पार पडली. मिरवणुकीदरम्यान भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमात कुर्ला येथील लेझीम पथकाने आकर्षक सादरीकरण करून वातावरण अधिक रंगतदार केले. तसेच विविध वेशभूषेत सहभागी झालेले विद्यार्थी आणि नागरिकांनीही लक्ष वेधून घेतले. विशेषतः ज्ञानसागर गुरुकुलची वानर सेना तसेच राम पंचायतचे राम–लक्ष्मण वेशभूषेतील सहभागी हे शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले.संपूर्ण मिरवणूक भक्तिमय वातावरणात आणि उत्साहपूर्ण प्रतिसादात पार पडली.

# प्राणी व पशु पक्षांची जंगलात पाणवठाची व्यवस्था करावी– वनश्री मेजर एस पी कुलकर्णी यांची मागणी

**अंबाजोगाई (प्रतिनिधी) :–**

मानवाचे नैतिक कर्तव्य म्हणून जंगलातील प्राणी पक्षी यांची काळजी घेणे गरजेचे आहे.यावर्षी मोठ्या प्रमाणात दुष्काळ जन्य परिस्थिती आहे. मानवाला पाणीटंचाई चां सामना करावा लागत आहे. पाण्यासाठी काही दिशा फिरावे लागत आहे. जंगले ओसाड पडत आहेत. मानवाला फिरत फिरत थोडेफार पाणी मिळेल. पण जंगलात फिरणारी जनावरे ,पक्षी, प्राणी यांना शोधूनही पाण्याचा थेंब मिळत नाही. जंगलात पानवठे नद्या नाले कोरडी पडलेली आहेत. पाणी हेच जीवन आहे. पाण्याशिवाय जीवसृष्टी जगू शकत नाही.



जंगलात दुर दुर पाण्याचा थेंब दिसत नाहीत. त्याच्यावर मरणाची वेळ आलेली आहे. तेव्हा वनामध्ये पाणवठे तयार करून त्याच्यात पाणीसाठा करावा व या भीषण संकटातून प्राणी पक्षांना मुक्त करावे. त्या पाणवट्यात पाणी टाकावे व मुक्त जनावरांचा आशीर्वाद घ्यावा. त्यांनाही आपल्या प्रमाणे जीव आहे. पूर्वी दलदलीचा प्रदेश जंगलामध्ये असायचा त्यांच्या ठिकाणी पाणवठे असायची. पण पावसाचे प्रमाण कमी झाले तसे पाण्याची पातळी खोल गेली. आज मोठ्या संकटाला त्यामुळे सामना करावा लागत आहे. माझे सर्व नागरिकांनाही आव्हान आहे की आपण आपल्या घरावर, गच्चीवर चिमण्या, पक्षी यासाठी पाणवटे तयार कराविण्यात यावीत. एक घास चिमण्यांसाठी हा उपक्रम राबवून त्यांची संवर्धन करावे.

# इंस्टाग्राममधून बाहेर पडा', राज ठाकरेंचा तरुणांच्या मानसिकतेवर प्रहार; इराणच्या मुद्द्यावरून मोदींनाही टोला

**मुंबई । प्रतिनिधी**

**गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मुंबईचे शिवतीर्थ पुन्हा एकदा राज ठाकरेंच्या धडाकेबाज भाषणाने आणि मनसैनिकांच्या अलोट गर्दीने दणाणून गेले. मुंबई महापालिका निवडणुकीनंतर प्रथमच एवढ्या मोठ्या जंगी सभेला संबोधित करताना राज ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांचे वाभाडे काढलेच, पण त्याचसोबत दिशाहीन होत चाललेल्या महाराष्ट्राच्या तरुण पिढीला आणि जनतेला 'घरचा आहेर'ही दिला.**

'सत्ता भविष्यात हाती घेणार म्हणजे घेणारच! महाराष्ट्र नवनिर्माण सेना या मातीसाठी आणि तुमच्यासाठी खंबीरपणे उभी आहे.' असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य फुंकले. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणाची सुरुवात जागतिक राजकारणातून करत केंद्र सरकारला धारेवर धरले. ते म्हणाले, 'इराणने अनेक वर्षे भारताला साथ दिली आहे, विशेषतः जम्मू–काश्मीरच्या मुद्द्यावर इराण ठामपणे भारताच्या पाठीशी उभा राहिला. मात्र, खामेनेईंच्या मृत्यूनंतर पंतप्रधान मोदींनी साधी श्रद्धांजलीही वाहिली नाही. ज्यांनी आपल्याला साथ दिली, त्यांना आपण साथ द्यायला हवी होती. या कृतघ्नतेचा त्रास भविष्यात भारताला सहन करावा लागेल.' जनतेच्या मानसिकतेवर प्रहार करताना राज ठाकरे अधिक आक्रमक झाले. 'सरकारला प्रश्न विचारू नये म्हणून जाणीवपूर्वक जनतेला करमणुकीच्या गटांगळ्यांत गुंतवले जात आहे. मोबाईल आणि इंस्टाग्रामच्या जगातून बाहेर पडा! आजूबाजूला काय चाललंय याचं भान उरलं नाहीये का?' असा संतप्त सवाल त्यांनी केला. महाराष्ट्राची अवस्था वाईट झाली असताना जनता मात्र केवळ करमणुकीत वाहून जात असल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. राज्याच्या आर्थिक स्थितीवर बोलताना त्यांनी धक्कादायक आकडेवारी मांडली. ते म्हणाले, 'पृथ्वीराज चव्हाण्यांचा काळ संपला तेव्हा राज्यावर २ लाख कोटींचे कर्ज होते, आज ते ११ लाख कोटींवर पोहोचले आहे. राज्यातील शहरे वाहतूक कोंडीत फसली असून पायाभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या होत आहेत. तीनवेळा कर्जमाफी होऊनही बळीराजाचा फास सुटलेला नाही.'सत्ताधारी आणि उद्योगपतींच्या अभद्र युतीवर टीका करताना राज ठाकरे म्हणाले, 'सगळं काही अदानींसारख्या उद्योगपतींच्या घशात घातलं जातंय. आमदारांना आणि खासदारांना फक्त पैसा दिसतोय. महाराष्ट्र स्वतःचं अस्तित्व गमावतोय आणि हे लोक राज्य विकायला काढल्यासारखे वागत आहेत. कोणतीही सुरक्षिततेची हमी नसलेल्या राज्यात आपण राहतोय का?' भाषणात अत्यंत गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधून, 'महाराष्ट्रातील तरुण पिढी ड्रग्जच्या आहारी गेली आहे. महाविद्यालयांच्या गेटवर ड्रग्ज मिळतंय. पोलीस काय करतायत? गेल्या नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात फक्त मुंबईतील ८६ मुले बेपत्ता झाली आहेत, ही धोक्याची घंटा आहे,' असा इशारा राज ठाकरे यांनी दिला.

# स्वा.सावरकर प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय ऑलम्पियाडमध्ये नेत्रदीपक कामगिरी

## आराध्या आमेल ढास, सिद्धी वालुरकर आणि तृणाली थोरात यांनी शिष्यवृत्ती व मेडल जिंकले

**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित स्वा. सावरकर प्राथमिक विद्यालयच्या विद्यार्थ्यांनी ऑलम्पियाडच्या राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पहिली ते सातवीच्या एकूण ९६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह अंतिम फेरीत प्रवेश मिळवला होता.**

फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय अंतिम फेरीचा निकाल जाहीर झाला असून, कु. आराध्या अमोल ढास (४ था क्रमांक), कु. सिद्धी शिवकुमार वालुरकर (१३ वा



क्रमांक) आणि कु. तृणाली बिभीषण थोरात (१७ वा क्रमांक) यांनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्ती तसेच मेडल प्राप्त केले आहे. या नेत्रदीपक कामगिरीबद्दल संस्थेचे मुख्य प्रशासकीय अधिकारी व प्राचार्य मा. श्री. चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य मा. श्री. ऊमेशजी जगताप, शालेय समितीचे अध्यक्ष मा. श्री. सतिशजी कुलकर्णी, उपक्रमशील मुख्याध्यापिका श्रीमती बालिकाताई देशमुख, स्पर्धा परीक्षा प्रमुख श्री. शरद भवर व श्रीमती पल्लवी खंबायते, तसेच सर्व वर्ग शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे शाळेचा गौरव वाढला असून, शिक्षणात प्रावीण्य मिळविण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी विद्यार्थी प्रेरित झाले आहेत. तसेच या यशामुळे शाळेच्या शिक्षकांचे प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर केलेल्या प्रयत्नांची गुणवत्ता स्पष्ट झाली आहे. शाळेच्या प्रशासनाने आणि शिक्षकांनी या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत, तसेच इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक स्पर्धांमध्ये सहभागी होऊन उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले आहे.

पान १ वरून...

### बीडमध्ये शेतात गांजाची लागवड

फायद्यासाठी गांजाच्या झाडांची छुप्या पद्धतीने लागवड करण्यात आल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे बुधवारी पोलीस पथकाने संबंधित शेतात छापा टाकला. यावेळी शेतात कपाशी किंवा इतर पिकांच्या आड गांजाची झाडे लावली असल्याचे दिसून आले. पोलिसांनी तात्काळ ही सर्व झाडे उपटून काढली आणि २२ किलोच्या आसपास मुद्देमाल ताब्यात घेतला. याप्रकरणी शेतमालक आशाबाई शिंगारे (वय ४३ वर्ष) हिला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी महिलेविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही महिला गेल्या किती दिवसांपासून हा व्यवसाय करत होती आणि यामागे कोणते मोठे रॅकेट सक्रिय आहे का, याचा तपास आता पोलीस करत आहेत.

------------

### राज्यात पिकांवर रोगराईचा प्रभाव;

अंतर्गत परभणी जिल्ह्यातील हळद पिकासाठी विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांकडे कापूस व कांदा साठवून ठेवण्याबाबतही स्पष्टीकरण देताना, बाजारभाव अनुकूल नसल्यास उत्पादन घरात साठवून योग्य वेळी विक्री करण्याची पारंपरिक पद्धत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या विषयावर आमदार मनोज कायंदे, डॉ. राहुल पाटील, अब्दुल सत्तार आणि मुफती मोहम्मद इस्माईल यांनी प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांच्या अडचणींकडे लक्ष वेधले होते. दरम्यान, राज्यात काही ठिकाणी किडी व रोगांचा प्रभाव दिसत असला, तरी व्यापक पातळीवर पीकहानी झालेली नसल्याचा सरकारचा दावा आहे. मात्र, बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली अनिश्चितता आणि शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

--------------

### दैनिक राज्य लोकतंत्रचा

माध्यम म्हणून ओळखले जाते. शेतकरी, ग्रामीण भागातील समस्या, शेतीतील नवतंत्रज्ञान, बाजारपेठेतील घडामोडी आणि शासकीय योजना यांचा सखोल वेध घेत दैनिकाने अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळेच ग्रामीण भागातील वाचकवर्गाशी या दैनिकाचे घट्ट नाते निर्माण झाले आहे. गेल्या चार वर्षांच्या प्रवासात दैनिकाने अनेक सामाजिक प्रश्न मांडत जनतेचा आवाज बुलंद केला. पत्रकारितेतील प्रामाणिकपणा, निर्भीड लेखनशैली आणि जनहिताची भूमिका यामुळे वाचकांचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत आहे. याच विश्वासाच्या बळावर दैनिकाने राज्यभरात आपले जाळे विस्तारले आहे. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी दैनिकाच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ''शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देणारे हे व्यासपीठ अधिक बळकट व्हावे,'' अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी चहापानाचा कार्यक्रम पार पडला. सर्व उपस्थितांनी अनौपचारिक गाठीभेटी घेत एकमेकांशी विचारांची देवाणघेवाण केली. एकूणच, दैनिक राज्य लोकतंत्रचा पाचवा वर्धापन दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, वाचक, पत्रकार आणि समाज यांना जोडणारा उत्सव ठरला.

-----------

### ६८ लाखांचे इनाम असलेल्या ११

मट्टामी, धनू दसरु वेळंजे, सुनीता उर्फ वंगे वत्ते होयाम, रमेश पांडू मडावी आणि किशोर सुक्रय्या वासम यांचा आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये समावेश आहे. नक्षल आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आजतागायत ७४९, तर २०२५ पासून १२३ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. याप्रसंगी नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, उपमहानिरीक्षक अंकित गोयल, केंद्रीय राखीव दलाचे उपमहानिरीक्षक अजयकुमार शर्मा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलिस अधीक्षक एम.रमेश, गोकुल राज जी, अभियानप्रमुख विशाल नागरगोजे उपस्थित होते. सोनी मट्टामी(४५) ही छत्तीसगडमधील रहिवासी असून, तेथील कुतुल दलमची विभागीय समिती सदस्य होती. सन २००० पासून ती नक्षल चळवळीत कार्यरत होती. बुदरी मट्टामी(४०) ही देखील छत्तीसगडची रहिवासी असून, २००२ पासून तेथील विविध दलममध्ये कार्य केल्यानंतर सध्या इंद्रावती एरिया कमिटीची सचिव म्हणून कार्यरत होती. छत्तीसगडचा रहिवासी असलेला सुखलाल कोक्सा(३१) हा २०१३ मध्ये नक्षल्यांच्या गडचिरोली जिल्ह्यातील तांत्रिक समितीत भरती झाला. २०२४ पासून तो पश्चिम ब्युरो सप्लाय टीमचा कमांडर होता. शांती तेलामी सप्लाय टीमची सदस्य होती. यमुनक्का पेंदाम ही भामरागड दलमची एरिया कमिटी सदस्य होती. गणेश कोवासी, मिनको मट्टामी व धनू वेळंजे हे कंपनी क्रमांक १० चे सदस्य होते. सुनीता होयाम ही सैंड्रा दलमची सदस्य, रमेश मडावी हा मोबाईल पोलिटीकल स्कूलचा सदस्य तर किशोर वासम हा सैंड्रा दलमचा मिलिशिया कमांडर होता.

---------

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### श्री राम जन्मोत्सवानिमित्त सौताडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

श्री राम जन्मोत्सवानिमित्त सौताडा येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.



या सप्ताहाची सुरुवात गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी झाली असून समारोप शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी होणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांतर्गत दररोज काकडा हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन व हरिजगार यांचा समावेश आहे. राज्यभरातील नामवंत कीर्तनकार व यांची उपस्थिती लाभणार असून त्यांच्या परमपूज्य पांडुरंग प्रभाकर देशमुख शास्त्री व ह भ प महबूब महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनातून भाविकांना अध्यात्मिक ज्ञानाचा लाभ मिळणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. रविदास वांदळे महाराज आदे , ह.भ.प. बाजीराव महाराज बामदाळे , ह.भ.प. कृष्णा महाराज काकडे, ह.भ.प. चैतन्य महाराज शास्त्री, ह.भ.प. प्रकाश महाराज बोथले, ह.भ.प. वैजनाथ महाराज जाधव, ह.भ.प. साध्वी सोनाली दीदी करपे ह भ प रामकृष्ण रणदिवे बापू यांचे राम जन्म निमित्त विशेष असे किर्तन होणार आहे अनेक मान्यवर कीर्तनकारांची उपस्थिती राहणार आहे.तसेच महिला कीर्तनकार महंत ह.भ.प. राधाताई महाराज सानप यांचे काल्याचे किर्तन होणार आहे सप्ताहादरम्यान भव्य दिंडी, कीर्तन सोहळे व विविध धार्मिक विधी पार पडणार असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाचे आयोजन श्री रामेश्वर जन्मोत्सव मंडळ, सौताडा व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रयागबाई मुळे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी



तालुक्यातील शृंगारवाडी येथील रहिवासी असलेल्या प्रयागबाई आबासाहेब मुळे वय ९० वर्षे यांचे दि. १७ मार्च मंगळवार रोजी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिव देहावर दि.१८ मार्च बुधवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परियावर आहे दि.२० मार्च शुक्रवार रोजी त्यांचा सावडण्याचा कार्यक्रम होणार आहे.बाजार समीतीचे कोषपाल मिनानाथ मुळे यांच्या त्या मातोश्री होत.

### माजलगाव येथे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा जनता दरबार

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दि १८ मार्च बुधवार रोजी सकाळी ११:०० वाजता माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयात आयोजित जनता दरबारात नागरिकांच्या समस्या व तक्रारी ऐकून घेतल्या.



या दरम्यान नागरिकांनी विविध शासकीय कामकाज,पाणी, महसूल व इतर समस्यांबाबत तक्रारी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्याच्या सूचना दिल्या.यावेळी अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,तहसीलदार संतोष रूईकर, गटविकास अधिकारी ज्योत्सना मुळीक आणि मुख्याधिकारी सुंदर बोंदर उपस्थित होते.

# घरकुलांसह वैयक्तिक लाभाच्या योजनांची लाभार्थी संख्या आणि विकास कामे दुपटीने करण्यासाठी प्रयत्नशील - धनंजय मुंडे

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ शहर विकासाच्या वाटेवर असून मागील काही दिवसांत मी अत्यंत कठीण परिस्थितीत असताना परळीतील नागरिकांनी महायुतीच्या पाठीशी भक्कम ताकद उभी करत नगर परिषद आमच्या ताब्यात दिली. त्यामुळे विविध योजनेतील घरकुले, अन्य वैयक्तिक लाभाच्या योजनामधील लाभार्थी संख्या आणि सार्वजनिक हिताच्या विकासकामांचा वेग आता दुप्पट करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या मदतीने अधिक व्यापक काम करणार असल्याचे मत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केले.

परळी वैद्यनाथ नगर परिषदेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत मंजूर ६७७ घरकुल लाभार्थींना पहिल्या हप्त्याची प्रत्येकी एक लाख रुपये रक्कमेचे धनादेश आज धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात वितरीत करण्यात आले.

यावेळी नगर परिषद अंतर्गत रमाई आवास योजनेतून आणखी २०० घरकुले मंजूर करण्यात आली असून त्याचे प्रस्ताव व अन्य बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकारी व नगरसेवकांना दिल्या. या कार्यक्रमा प्रसंगी ५६५ दिव्यांग बांधवांना नगर परिषदेच्या ५% राखीव निधीतून आर्थिक मदतीचेही वितरण श्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. मागील काही महिन्यात राज्यातील अनेक मोठ्या नेत्यांनी मला ठरवून बदनाम केले, मात्र माझी परळीची जनता ठामपणे माझ्या पाठीशी उभी आहे, याचा मला अभिमान व आनंद वाटतो आणि तितकीच जबाबदारीची जाणीवही होते, असेही धनंजय मुंडे यांनी नमूद केले. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री



बाजीराव धर्माधिकारी, अजय मुंडे, दिव्यांग कल्याण महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, राजा खान, प्रा. पवन मुंडे, रवींद्र गित्ते, राजाभाऊ पोळ, माणिकभाऊ फड, श्रीकृष्ण कराड यांच्या सह विविध प्रभागातील नगरसेवक, नगर परिषद मुख्याधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## पात्रुड नगरीत १९ वर्षांची भक्ती परंपरा कायम; गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर हरिनाम सप्ताह

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हिंदू नववर्ष म्हणजेच गुढीपाडव्याचे औचित्य साधून १९ व्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन (नर्मदा परिक्रमा पूर्ण श्री ह.भ.प. भगवानबाबा महाराज पात्रुडकर) यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले आहे.

उद्या पासून या भक्ती सोहळ्याला प्रारंभ होत असून पात्रुड नगरीत चैतन्यमय वातावरण निर्माण झाले आहे

गेल्या १९ वर्षांपासून पात्रुड ग्रामस्थांनी ही आध्यात्मिक परंपरा अत्यंत निष्ठेने आणि एकजुटीने जपली आहे १९ व्या वर्षात पदार्पण करणारा हा सोहळा यावर्षी अधिक भव्य



स्वरूपात साजरा होत असून यानिमित्ताने संपूर्ण गावात स्वच्छतेची मोहीम आणि मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे

सप्ताहाच्या कालावधीत दररोज पहाटे ३ ते ५ काकडा भजन सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १२ ते १ गाथा भजन,२ ते ५ श्री भागवत कथा, कथा प्रवक्त्या (श्री ह भप ज्ञानेश्वरीताई बागुल नाशिक) यांच्या अमृतमय वाणीतून पार पडणार आहे. ५:३० ते ६:३० हरिपाठ, रात्री ८ ते १० या वेळेत नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा होणार आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी सकाळी गावात 'भक्तीची गुढी' उभारून आणि मंगल कलश पूजनाने या सोहळ्याचा श्रीगणेशा होईल १९ वर्षांच्या या प्रदीर्घ परंपरेमुळे पात्रुडसह

पंचक्रोशीतील भाविकांमध्ये या सप्ताहाबद्दल मोठी श्रद्धा आहे सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होऊन त्यानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे आमच्या पूर्वजांनी सुरू केलेली ही १९ वर्षांची परंपरा पात्रुडच्या वैभवात भर घालणारी आहे तरी सर्व भाविकांनी या मंगलमय सोहळ्याचा आणि कीर्तन श्रवणाचा लाभ घ्यावा,असे आवाहन सप्ताह कमिटी व समस्त पात्रुड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे



## लिंबागणेशमध्ये शेतकरी सहवेदना दिवस पाळला; आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना श्रद्धांजली

लिंबागणेश । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात शेतकरी सहवेदना दिवस पाळून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती आदर व सहवेदना व्यक्त करण्यात आली. किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे व मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतून आपल्या चार मुलांसह सामूहिक आत्महत्या केली होती. या घटनेला यावर्षी ४० वर्षे पूर्ण झाली असून ती शेतकरी आत्महत्येची पहिली नोंद म्हणून ओळखली जाते. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्सच्या माहितीनुसार देशात दररोज सुमारे ४५ तर महाराष्ट्रात सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करतात. बीड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात २५६ आणि नव्या वर्षाच्या सुरुवातीच्या दीड महिन्यातच ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तु कायदा, जमिन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी शेतकरीविरोधी कायदे रद्द करावेत, तसेच प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी व शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी आंदोलनाची गरज असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले. या पार्श्वभूमीवर आज (दि.१९) ग्रामपंचायत कार्यालयात सामूहिकरीत्या अन्नत्याग (उपोषण) आंदोलन करण्यात आले. या माध्यमातून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, बाळकृष्ण थोरात, ॲड. गणेश वाणी, दामोदर थोरात, दादा गायकवाड, गणपत तागड, रामकिसन गिरे, बिभिषण वाणी, संतोष भोसले, रामदास मुळे, रामचंद्र गिरे, शहादेव कोल्हे, मोहन कोटुळे, सुंदरराव जाधव, विठ्ठल कदम, सिताराम थोरात, सुरेश मोरे, शाकींदर काटकर आदींसह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## बीडमध्ये रंगणार भव्य रामोत्सव; श्री श्री शंकर भारती महास्वामीजींच्या उपस्थितीत विविध धार्मिक सोहळ्यांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

हिंदू नववर्ष आणि रामनवमीच्या शुभमुहूर्तावर बीड शहरात भव्य रामोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. म्हैसूर येथील श्री योगानंदेश्वर सरस्वती मठ, कृष्णराजनगरचे पीठाधीश्वर परमपूज्य श्री श्री शंकर भारती महास्वामीजी यांच्या पावन उपस्थितीत हा सोहळा १८ मार्च ते २८ मार्च २०२६ या कालावधीत मोंढा रोडवरील रविराज मंगल कार्यालय येथे संपन्न होणार आहे.

भव्य शोभायात्रेने होणार प्रारंभ

या उत्सवाची सुरुवात बुधवार, १८ मार्च रोजी दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रेने होईल. ही शोभायात्रा बलभीम चौक, धोंडीपुरा, माळीवेस, संत सावतामाळी चौक, मोंढा रोड या मार्गे निघून रविराज मंगल कार्यालय येथे विसावेल. त्यानंतर महास्वामीजींची पाद्यपूजा करण्यात येईल.

१० दिवस आध्यात्मिक मेजवानी

उत्सवादरम्यान दररोज पहाटे ५:३० वाजल्यापासून रात्री ८:३० वाजेपर्यंत विविध धार्मिक विधी पार पडणार आहेत. यात प्रामुख्याने दैनिक कार्यक्रमात प्रातः नित्य पूजन, श्री चर्तुवेद पारायण, रामोत्सव विशेष कल्पोक्त पूजा, अष्टावधान सेवा आणि सायंकाळी नित्य पूजा होईल.

गीता पठण, प्रवचन सेवा, भजन विशेष आकर्षण

गीता पठण, प्रवचन सेवा, भजन, सामुदायिक रामरक्षा पठण आणि परळी वैजनाथ व तुळजापूर येथील देवीचे दर्शन असे भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

२८ मार्च रोजी महाप्रसाद

उत्सवाचा समारोप शनिवार, २८ मार्च रोजी सकाळी ४:३० वाजता महास्वामीजींच्या पूजन आणि आशीर्वचनाने होईल. त्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन

विजय यात्रा स्वागत समिती, बीड तर्फे सर्व हिंदू बांधवांना आणि भाविकांना या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दर्शन आणि पूजेसाठी येताना भाविकांनी भारतीय पोशाखात यावे, अशी विनंतीही समितीने केली आहे.

## भीमनगर जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भीमनगर येथे जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी भीमनगर जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यावेळी परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, तरुण मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



समितीच्या अध्यक्षपदी सचिन टाकणखार यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी किशोर भाऊ सातपुते, कोषाध्यक्षपदी शिशिर प्रधान, सचिवपदी अनिल डोंगरे, सहसचिवपदी रवि सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच राहुल मस्के यांची संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय समितीच्या सल्लागारपदी प्रदीप पट्टेकर, कपिल वाघमारे व सदानंद भैया प्रधान यांची निवड करण्यात आली असून मार्गदर्शक म्हणून कचरु तात्या खळगे, राजेश साळवे, नवनाथ धाईजे व अंकुश जाधव यांचा समावेश करण्यात आला आहे.

या जयंती उत्सवानिमित्त भीमनगर परिसरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा संकल्प समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच जयंती उत्सव मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध व प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही समितीच्या वतीने करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीस अंबऋषी स्वामी, टी. आर. जावळे, प्रदीप साळवे, राजेंद्र टाकणखार, गणेश जावळे, अक्षय साळवे, संतोष घाडगे, संजय ससाणे, गौतम टाकणखार, संदेश डोंगरे, राहुल निसर्गंध, विजय राऊत, रवि टाकणखार, प्रकाश शिंदे, राम गायकवाड, विजय पोळ, नरहरी जावळे, दिनेश धाईजे, अनंत वाघमारे, राजरत्न खळगे, राजपाल जावळे, सचिन वाघमारे, सतीश स्वामी, शंकर चव्हाण, दिलीप भालेराव, नितीन ससाणे, अनंत कांबळे, गब्बर ससाणे, निलेश कांबळे, प्रवीण निसर्गंध, मुसा धापसे, धम्मपाल जावळे, आकाश सावंत, केतन प्रधान, प्रवीण ओव्हाळ, सिद्धार्थ लोखंडे, साजण साळवे, स्वप्नील स्वामी, भारत ओव्हाळ, प्रकाश खळगे, सुशांत फुलवरे, राज सोनवणे, सिद्धार्थ निसर्गंध, सचिन पट्टेकर, नंदकिशोर निसर्गंध, संदेश निसर्गंध, अनिल गाडेकर, ऋषिकेश पट्टेकर, आदेश धाईजे, संकेत खळगे, दिपक साळवे, दिपक शिंदे, अमोल खळगे, मंगेश पोळ, सतीश जाधव, मिलिंद खळगे, ऋषिकेश, सोनवणे, विशाल सोनपसारे, सुबोध खळगे, विनोद शिंदे, सुजल खळगे, ॲड.चेतन सातपुते, मयुर प्रधान, रुपेश वाल्मिकी, रितेश शिनगारे, अमोल गायकवाड, सारंग स्वामी, रविराज भालेराव, विश्वजित साळवे, राहुल कांबळे, पवन उजगरे,निखिल टाकणखार, अविनाश गायकवाड,पि.जे उजगरे,लखन निसर्गंध, शशिकांत साळवे, भागवत गाडेकर, प्रकाश निसर्गंध, गोगा कांबळे, किरण जावळे, प्रतीक जाधव, गब्बर निसर्गंध, आशिष धाईजे आदी उपस्थित होते.



## बँकांनी 'नवे-जुने' च्या नावाखाली शेतकऱ्यांना फसवले -राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. देशातील पहिल्या शेतकरी आत्महत्येला ४० वर्ष उलटले. यानंतर तरीही शेतकरी आत्महत्या नियंत्रणात येण्याची गरज होती परंतु दिवसेंदिवस आत्महत्यांची संख्या वाढत आहे या आत्महत्या रोखण्यात सरकारला अपयश येत आहे. यामुळेच शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने जनजागृती मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती शेतकरी नेते राजेंद्र आमटे यांनी दिली.

शेतकऱ्यांना कर्जमाफी घोषणेनंतर अनेक बँकांनी शेतकऱ्यांचे कर्ज नवे, जुने केले. शेतकऱ्याला कर्जमाफी संदर्भात माहिती न देता अंधारात ठेवून कर्ज नवे, जुने करून नियमित दाखवण्याचे काम केले. या नव्या जुन्यामुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहे. ज्या ज्या बँकांच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती न देता फसवणूक करून कर्ज नवे , जुने करून घेतले. त्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकरी कृतज्ञता दिनानिमित्त अन्नत्याग उपवास पूर्वी शेतकरी हक्क मोर्चाच्या खांडे पारगाव येथे वतीने करण्यात आली. सरकार एकीकडे कर्जमाफीची घोषणा करते तर दुसरीकडे या कर्जमाफीच्या योजनेत शेतकरी येऊच नये यासाठी बँकांना सूचना देऊन कर्ज नियमित दाखविण्याचा प्रयत्न करते म्हणजे सरकारच्या घोषणे त खोट असून अनेक शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे. केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली. शेतकऱ्याची पहिली आत्महत्या ४० वर्षांपूर्वी झाली यावेळीच उपायोजनाला सुरुवात करण्याची गरज होती मात्र ४० वर्षानंतरही शेतकरी आत्महत्या नियंत्रणात येत नसल्याने आता शेतकरी हक्क मोर्च्याच्या वतीने जनजागृती करून सरकार आणि प्रशासन यांची चलाखीची परिस्थिती शेतकऱ्यासमोर मांडणार आहेत. वेळीच शेतकऱ्यांची दिशाभूल थांबवा व सरसकट कर्जमाफी द्या अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, ह. भ.प. आसाराम महाराज, हरिभाऊ आमटे पाटील, लक्ष्मण आमटे खंडू सुरवसे, मोतीराम आमटे, धोंडीराम सपकाळ, राधेश्याम आमटे,संजय आमटे, रामप्रसाद आमटे, मधुकर सपकाळ, नवनाथ साळुंखे, राजाभाऊ ठोकळ, महादेव धारवडकर, बाळू चऱ्हाटकर, सुदाम आमटे, नितीन आमटे, ऋषी आमटे, आकाश आमटे आदी उपस्थित होते.

## आदित्य कृषी च्या माजी विद्यार्थिनी डॉ. श्रद्धा एडके यांचा धाराशिवमध्ये "तेजस्विनी कन्या" म्हणून गौरव

बीड । प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्था, बीड यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा गौरवही झाला. संस्थेच्या आदित्य कृषी शाखेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. श्रद्धा संजयकुमार एडके यांना "तेजस्विनी कन्या" या प्रतिष्ठित सन्मानाने जागतिक महिला दिनानिमित्त गौरविण्यात आले. धाराशिव जिल्हा प्रशासनाच्या वतीने धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.




डॉ. श्रद्धा एडके यांच्या उतृष्ठ यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेत एडके यांचा गौरव करण्यात आला. डॉ. श्रद्धा एडके यांनी आदित्य कृषी शाख, बीड येथे सन २०१३ ते २०१७ या कालावधीत बी.एस्सी. ॲग्रिकल्चर पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यांनी वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी येथून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यांनी डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापीठ, दापोली येथून पीएच.डी. पूर्ण केली. त्यांनी उद्यानविद्याशास्त्र विभागात भाजीपाला शास्त्र (व्हेजिटेबल सायन्स ) या विषयात संशोधन केले. पीएच.डी.मधील त्यांचे संशोधन कार्य उल्लेखनीय आहे. "कोकण कृषी-हवामानिक परिस्थितीत पोल प्रकार डोलिचोस बीन्स यांचे संकलन व मूल्यांकन आणि आण्विक मार्कर्सद्वारे त्यांचा विविधता विश्लेषण" या विषयावर त्यांनी संशोधन केले. त्यांनी वेलवर्गीय घेवडा या पिकाचा डी एन ए -आधारित जनुकीय अभ्यास केला. या कार्यामुळे त्यांनी कोकण कृषी विद्यापीठात नावलौकिक मिळवला. कृषी क्षेत्रातील विविध विषयांवर त्यांनी सखोल अभ्यास केला. त्यांनी संशोधनात्मक कार्यही केले. त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आधुनिक तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ, उत्पन्नवाढ याबाबत प्रभावी मदत केली. त्यांच्या कार्यामुळे अनेक शेतकऱ्यांना उत्पादनवाढीसह आर्थिक लाभ झाला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी केलेल्या कार्याची दखल घेण्यात आली. त्यांना "तेजस्विनी कन्या" या सन्मानाने गौरविण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल आदित्य कृषी शाखा, बीड येथेही डॉ. श्रद्धा एडके यांचा सत्कार करण्यात आला. आदित्य शिक्षण संस्था, बीडच्या सन्माननीय संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या हस्ते हा सत्कार झाला. त्यांच्या भावी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या. अशीच प्रगती करत राहा, असेही सांगण्यात आले. प्राचार्य श्याम भूतडा यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. भविष्यातही कृषी क्षेत्रात अशीच उल्लेखनीय कामगिरी करत शेतकरी व समाजाच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, अशा शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनीही डॉ. श्रद्धा एडके यांचे अभिनंदन केले. त्यांनी त्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला. डॉ. श्रद्धा एडके यांचा हा सन्मान आदित्य कृषी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

आमच्या संस्थेच्या विद्यार्थिनीने मिळवलेला हा सन्मान अत्यंत अभिमानास्पद आहे. आदित्य शिक्षण संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. अशा यशस्वी विद्यार्थ्यांमुळे संस्थेचे नाव अधिक उंचावत आहे. भविष्यातही असेच गुणवंत विद्यार्थी घडत राहतील. याचा आम्हाला विश्वास आहे.

-डॉ. आदिती सारडा, संचालिका, आदित्य शिक्षण संस्था, बीड

# एलपीजी गॅस टंचाईवर इथेनॉल स्टोव्हला परवानगीची मागणी

## शेतकऱ्यांना होईल फायदा, ग्रेन इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनकडून केंद्राकडे प्रस्ताव

मुंबई : पश्चिम आशियातील युद्धा जागतिक स्तरावर अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याचा फटका भारताला बसत आहे. त्यातच आता एलपीजीच्या गॅस टंचाईने ग्राहक हैराण झाले आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने एलपीजी गॅसला पर्याय म्हणून घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी इथेनॉल आधारित स्टोव्हला परवानगी द्यावी, अशी मागणी ग्रेन इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने केली आहे.

याबाबतचा प्रस्ताव पंतप्रधान कार्यालय आणि मंत्रालयांना सादर करण्यात आला असून घरगुती आणि व्यावसायिक वापरासाठी एलपीजीला पूरक स्वच्छ इंधन पर्याय उपलब्ध करून द्यावा. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होईल. तसेच ग्राहकांना स्वच्छ इंधनाचा पर्याय उपलब्ध होऊ शकेल, असा दावाही असोसिएशनने केला आहे. या प्रस्तावात भारताने पंतप्रधान उज्ज्वला योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणावर एलपीजीचा प्रसार केल्याचे म्हटले आहे. त्यामुळे लाखो कुटुंबांना स्वच्छ इंधन उपलब्ध झाले आहे. या योजनेमुळे घरातील धूर कमी झाला असून जीवनमान सुधारले. परंतु देश अजूनही स्वयंपाकासाठी लागणाऱ्या एलपीजीसाठी मोठ्या प्रमाणावर आयातीवर अवलंबून असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सध्या जगभरात पश्चिम आशियातील देशांमधील युद्धामुळे एलपीजीची पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यामुळे एलपीजीच्या किंमतीत वाढ होण्याची चिन्हं आहेत. त्यामुळे भारताने इथेनॉल स्वदेशी इथेनॉलचा वापरावर देऊन पर्यायी इंधनाचे स्त्रोत शोधण्याची गरज असल्याचे मत असोसिएशनने व्यक्त केले आहे. केंद्र सरकार, तेल विपणन कंपन्या आणि तांत्रिक संस्थांची मदत घेऊन या इथेनॉल स्टोव्हचा पायलट प्रकल्प सुरु करण्याची मागणी ग्रेन इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने केली आहे. या प्रकल्पाच्या अंतर्गत इथेनॉल स्टोव्हची तांत्रिक व्यवहार्यता, सुरक्षितता मानके आणि आर्थिक फायदे तपासले जातील. जर हा पर्याय योग्य ठरला, तर इथेनॉल स्टोव्ह हा ग्राहकांसाठी एक अतिरिक्त स्वच्छ ऊर्जा पर्याय ठरू शकतो. त्यामुळे देशाची ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल, असा विश्वास ग्रेन इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने व्यक्त केला आहे. इथेनॉलवर आधारित स्वयंपाक स्टोव्ह हे देशात तयार होणाऱ्या जैवइंधनाचा अतिरिक्त वापर करण्याची मोठी संधी ठरू शकतात. जगातील अनेक देशांमध्ये हे स्टोव्ह स्वच्छ, धूररहित आणि कार्यक्षम स्वयंपाकासाठी वापरले जात आहेत. इथेनॉल इंधनामुळे स्वच्छ ज्वलन होते. घरातील वायू प्रदूषण कमी होते आणि हे इंधन देशातच तयार होणारे नूतनीकरणक्षम असल्यामुळे त्याचा उपयोग अधिक फायदेशीर ठरत असल्याचे या प्रस्तावात सांगण्यात आले आहे.



### इथेनॉलचा शेतकऱ्यांना फायदा

भारताने इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रम आणि राष्ट्रीय बायोफ्यूल धोरण यांच्या माध्यमातून इथेनॉल उत्पादनाची मजबूत व्यवस्था उभी केली आहे. त्यामुळे केवळ वाहतूक क्षेत्रालाच मदत झाली नाही, तर कृषी क्षेत्रालाही चालना मिळाली असून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत असल्याचा दावा ग्रेन इथेनॉल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनने केला आहे.

### इथेनॉलवरील स्टोव्ह

इथेनॉलवरील स्टोव्ह केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित न ठेवता रेस्टॉरंट, रस्त्यावरील अन्नपदार्थ विक्रेते आणि संस्थांच्या स्वयंपाकगृहांमध्येही वापरता येऊ शकतो. त्यामुळे भारताच्या स्वच्छ इंधनात विविधता येईल, इंधन क्षेत्र अधिक मजबूत होईल. परिणामी जैवइंधनासाठी नवीन बाजारपेठ निर्माण होईल, असा विश्वासही या प्रस्तावात व्यक्त करण्यात आला आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६०२ : डच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना
१७३९ : नादिरशहाने दिल्ली लुटली. मयूरासनासहित नवरत्ने लुटून इराणला पाठविली.
१८५४ : रिपब्लिकन पार्टी ऑफ अमेरिका या पक्षाची स्थापना झाली. या पक्षाला 'ग्रँड ओल्ड पार्टी' असेही म्हणण्यात येते.
१९०४ : चर्च ऑफ इंग्लंडचे पुजारी चार्ल्स फ्रीर अँड्र्यूज महात्मा गांधी यांच्या सोबत स्वातंत्रता आंदोलनामध्ये भाग घेण्यासाठी भारतात आले होते.
१९१६ : अल्बर्ट आइनस्टाइनने सापेक्षतावादाचा सिद्धांत प्रसिद्ध केला.
१९१७ : महाडचा चवदार तळे सत्याग्रह सुरु झाला.
१९२७ : डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह.
१९५६ : ट्युनिशियाला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९६६ : लंडन येथील वेस्टमिनिस्टर च्या सेंट्रल मध्ये प्रदर्शनी करिता ठेवण्यात आलेल्या फुटबॉल वर्ल्ड कप ची चोरी करण्यात आली होती.
१९८२ : फ्रांसने परमाणु शास्त्राची चाचणी केली.
२०१५ : सूर्यग्रहण, रात्र व दिवस सारखा असण्याचा काळ, आणि चंद्र पृथ्वीच्या सगळ्यात जवळ येणे हे सर्व एकाच दिवशी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१५ : मुघल बादशाहा शहाजहा व पत्नी मुमताज महल यांचे सर्वात थोरले पुत्र दारा शिकोह यांचा जन्म.
१८२८ : हेन्रिक इब्सेन  नॉर्वेजियन नाटककार, दिग्दर्शक आणि कवी (मृत्यू: २३ मे १९०६)
१९०८ : सर मायकेल रेडग्रेव्ह, ब्रिटिश अभिनेता (मृत्यू: २१ मार्च १९८५)
१९२० : वसंत कानेटकर, नाटककार.
१९२१ : भारतीय प्रशासकीय सेवेचे माजी अधिकारी पडिनजरेतकालकल चेरियन अलेक्झांडर यांचा जन्मदिन.
१९३९ : माजी भारतीय प्रथम श्रेणी क्रिकेट खेळाडू एच.एच. जामसाहेब शत्रुसूर्यासिंह जडेजा यांचा जन्म राजस्थान येथे झाला होता.
१९५१ : माजी भारतीय क्रिकेटपटू आणि भारतीय राष्ट्रीय क्रिकेट प्रशिक्षक मदनलाल उधौरम शर्मा यांचा जन्मदिन.
१९५२ : माजी भारतीय टेनिसपटू आणि व्यावसायिक आनंद अमृतराज यांचा जन्मदिन.
१९६६ : अलका याज्ञिक, पार्श्वगायिका
१९७३ : पहिले भारतीय खेळाडू अर्जुन अटवाल यांचा जन्मदिन.
१९८७ : कंगना राणावत, सिनेकलाकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५१ : लहरी सुलतान मुहम्मद बिन तुघलक.
१७२७ : सर आयझॅक न्यूटन  इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ, गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ. गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडला. गणितातील 'कॅल्क्युलस' या शाखेचे जनक (जन्म: २५ डिसेंबर १६४२)
१९२५ : लॉर्ड कर्झन  ब्रिटिश मुत्सद्दी आणि भारताचे व्हॉइसराय (जन्म: ११ जानेवारी १८५९)
१९५६ : बा. सी. मर्ढेकर  मराठी नवकाव्याचे प्रणेते (जन्म: १ डिसेंबर १९०९)
१९७० : माजी भारतीय हॉकी खेळाडू जयपालसिंग मुंडा यांचे निधन.
२०१४ : भारतीय पत्रकार आणि लेखक खुशवंत सिंग यांचे निधन. (जन्म: २ फेब्रुवारी १९१५)

# सौर कुंपण : शेताची रात्रंदिवस देखभाल शक्य



वाढत्या चोऱ्यांचे प्रमाण आणि दरवर्षी करावे लागणारे काटेरी कुंपण यामुळे भारतीय शेतकरी त्रस्त झाला आहे. अशा या वारंवारच्या कटकटीमुळे शेतकरी शेताच्या सभोवती तार टाकून त्यात विद्युत प्रवाह सोडण्याच्या भानगडीत पडतो आणि मग काही दुर्घटना झाल्यास इतरांचे व स्वत:चे संपूर्ण आयुष्याचे वाटोळे करून घेतो. तारेतून विद्युत प्रवाह सोडून आपल्या मालमत्तेला सुरक्षित ठेवण्याच्या या शेतकऱ्यांच्या संकल्पेनवर विचार करून शास्त्रज्ञांनी आता निर्धोक सौर कुंपण शोधून काढले आहे.

सौर कुंपण म्हणजे काय?

सौर कुंपण हे काही वेगळे कुंपण नूसन विद्युत प्रवाहीत तारेचे कुंपण आहे. त्यात फरक फक्त एवढाच की, या कुंपणात सौर ऊर्जेपासून तयार विद्युत, प्रवाह सोडण्यात येतो. परंतु अशा प्रकारच्या कुंपणाने (विद्युत प्रवाह असलेल्या कुंपणाने) जिवीतहानी होत नाही. या कुंपणाच्या सान्निध्यात गुरे, ढोरे, चोर किंवा इतर कोणतेही प्राणी आल्यास त्यांना जोराचा विजेचा झटका बसून ते कुंपणापासून दूर फेकले जातात. या कुंपणाचा विद्युत आघात असा असतो की एकदा, अनुभवल्यास कुणीही पुन्हा त्या कुंपणाजवळ जाण्याचे धाडस करत नाही. हे कुंपण २४ तास बॅटरीच्या सहाय्याने कार्य करत असते.

सौर कुंपणाचे आवश्यक घटक :

सौर कुंपण या पद्धतीला मुख्य चार घटकांची आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने सौर पॅनल, बॅटरी, प्रवाहयुक्त तार, नियंत्रक, सौर पॅनल, असंख्य सोलर सेल एका अशी जोडणी करून सोलर पॅनल तयार केले जाते जे कुंपणात प्रवाह पाठविण्यास मदत करते. आपल्याला आवश्यक कार्यक्षमतेनुसार आपण सौर पॅनलची निवड करू शकतो. मुख्यत: या पद्धतीत आपल्याला जास्त व्होल्टेजची व एकसारखा विद्युत सप्लायची आवश्यकता असते. त्यामुळे आपण वापरात घेतलेले पॅनल सीरीजमध्ये जोडतो. जेव्हा एखादी व्यक्ती किंवा प्राणी त्या तारेच्या संपर्कात येतात जेव्हा संपूर्ण सर्कीट तयार होऊन त्या प्राण्याच्या शरीरातून वाहून नियंत्रकाकडे जातो व एकदम जास्त व्होल्टेज तयार होते व संपर्कात आलेल्या व्यक्तीला एकदम जोरदार धक्का बसून बाजूला फेकला जातो.

# अधिक उत्पादनासाठी वापरा साखळी पीक पद्धती

साखळी पिक पद्धती शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत फायदेशीर पर्याय आहे, ज्यामुळे पीक उत्पादन वाढवण्यास मदत होते. यामध्ये ओलाव्याचा उत्तम वापर, जलवर्धनाची कमी आवश्यकता, आणि कमी काळात अधिक उत्पादन मिळवणे यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारू शकते. तरीही, शेतकऱ्यांनी स्थानिक हवामान, जमीन प्रकार आणि पिकांच्या गरजांनुसार योग्य पिकांची निवड करणे महत्त्वाचे आहे. या पद्धतीचा वापर शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी आणि अधिक नफ्याच्या दिशेने नेण्यास मदत करेल.

साखळी पिक पद्धत म्हणजे काय? : साखळी पिक पद्धतीमध्ये पहिले पीक कापणीपूर्वी किंवा काढणीपूर्वी दुसरे पीक पेरले जाते. म्हणजेच, पहिल्या पिकाच्या काढणीचा पूर्वीच दुसऱ्या पिकाची लागवड केली जाते. यामुळे दोन्ही पिकांच्या वाढीला फायदेशीर वातावरण मिळते. विशेषत:, पहिल्या पिकाने जमिनीत जो ओलावा ठेवलेला असतो, त्या ओलाव्याचा फायदा दुसऱ्या पिकाला मिळतो, ज्यामुळे त्याची वाढ जलद होऊ शकते.

साखळी पिक पद्धतीचे फायदे : ओलाव्याचा योग्य वापर: पहिल्या पिकात जो ओलावा असतो, तो दुसऱ्या पिकासाठी उपयोगी पडतो. त्यामुळे अतिरिक्त पाणी देण्याची आवश्यकता कमी होते, आणि दुसऱ्या पिकाची अधिक चांगली वाढ होते.

पाणी व्यवस्थापन : जर शेतकऱ्याकडे पाण्याची उपलब्धता असेल, तर साखळी पिक पद्धतीमध्ये दुसऱ्या पिकाची लागवड योग्य वेळी केली जाऊ शकते. यामुळे पाण्याचा योग्य वापर होतो आणि उत्पादन क्षमता वाढवता येते.कालावधी कमी होतो : दुसऱ्या पिकाचा कालावधी प्रथम पिकाच्या तुलनेत कमी असतो. त्यामुळे अधिक जलद उत्पादन प्राप्त करण्याचा फायदा मिळतो, आणि त्यात वेळेची देखील बचत होते फायदेशीर पिकांचे संयोजन : साखळी पिक पद्धतीने शेतकऱ्यांना विविध प्रकारची पिके एकाच शेतात लावता येतात, ज्यामुळे आर्थिक परतावा अधिक होतो.

सिंचनाचे योग्य नियोजन : या पद्धतीत ओलाव्याचा वापर चांगल्या प्रकारे होतो, ज्यामुळे सिंचनाची आवश्यकता कमी होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी कमी वापरता येते आणि त्यांचा खर्च कमी होतो. कापूस आणि सोयाबीन : कापूस काढणीपूर्वी, सोयाबीनाची लागवड केली जाऊ शकते. कापूस काढल्यावर ज्या जमीन मध्ये ओलावा असतो, त्याचा फायदा सोयाबीनला होतो. तांदूळ आणि भाजीपाला : तांदुळ काढणी झाल्यावर भाजीपाला (पालक, मेथी, कोथिंबीर) लावता येतो. तांदुळाच्या पिकामुळे जमीन ओलसर असते, ज्यामुळे भाजीपाला लवकर वाढतो आणि उत्पादन अधिक मिळवता येते.

बटाटा आणि टोमॅटो : बटाटा काढणीपूर्वी टोमॅटो किंवा इतर भाज्यांची लागवड केली जाऊ शकते. बटाटा काढल्यानंतर टोमॅटोसाठी पर्यायी जमीन तयार होते, ज्यामुळे त्याच्या उत्पादनाला वाव मिळतो.



# शेळ्या आजारी पडल्यास त्यांना या झाडांची पाने खाऊ घाला

बहुतेक वेळा शेळ्या बाहेर चरायला गेल्यावर काही विशिष्ट झाडांचा किंवा वनस्पतीचा पाला खातात. शेळ्या आजारी पडल्या तर ते स्वतःला बरे करण्यासाठी झाडे किंवा वनस्पतींची पाने खातात. परंतु सध्या बहुतेक शेळीपालक  शेळ्यांना बाहेर चरायला नेत नाही किंवा त्यांना शेळीपालन व्यवसायासाठी पुरेशी जागा सुद्धा नसते. अशा परिस्थितीत शेळ्यांना वेळोवेळी खाण्यासाठी अशा उपयुक्त झाडाची पाने द्यावीत. मोरिंगा, कडुनिंब, जामुन, बाईल आणि पेरूची पाने दिल्यास शेळ्यांना जास्त फायदा होईल. ही पाने शेळ्यांना अनेक रोगांपासून दूर ठेवतील.

हिरवा चारा हा दुभत्या जनावरांसाठी जीवनरक्षकापेक्षा कमी नाही. गाई, म्हशींबरोबरच शेळयांसाठीही हिरवे गवत आवश्यक असल्याचे जाणकार सांगतात. कारण त्यात अनेक औषधी औषधांचे गुणधर्म आढळतात. हे खाल्ल्यानंतर जनावरांची दूध देण्याची क्षमता वाढते. परंतु शेळयांसाठी गवतापेक्षा झाडांची पाने आणि वनस्पती अधिक फायदेशीर आहेत. पानांमध्ये असे घटक आणि औषधी गुणधर्म आढळतात, जे सेवन केल्याने शेळ्यांचे अनेक रोग आपोआप बरे होतात. कारण झाडांची पाने शेळ्यांसाठी औषध म्हणून काम करतात.

पानांमध्ये टॅनिनचे प्रमाण आणि प्रथिने :वास्तविक, मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने, कडुनिंब, जामुन, आणि पेरूच्या पानांमध्ये मुबलक प्रमाणात टॅनिन सामग्री आणि प्रथिने आढळतात, जे शेळ्यांसाठी खूप उपयुक्त आहेत. त्यांची पाने खाल्ल्याने शेळ्यांच्या पोटात जंत होत नाहीत. त्यामुळे शेळ्यांची वाढ झपाट्याने होते. त्यांचे वजनही झपाट्याने वाढते. शेळ्यांच्या पोटात जंत आल्यावर अनेक प्रकारचे आजार आपोआप उद्भवतात, असे तज्ज्ञ सांगतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.



शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होते :कडुनिंब, पेरू, जामुन, मोरिंगा ही झाडे तुम्हाला सर्वत्र सहजासहजी दिसणार नाहीत. तरीही तुम्हाला काळजी करण्याची गरज नाही. सीआयआरजी अशा पानांपासून बनवलेले औषध बाजारात विकत आहे. ते खाल्ल्यानंतर फायदा होईल. त्याचबरोबर शेळीच्या करडांना कडुनिंबाची पाने खाऊ घातल्यास त्यांच्या शरीरातील रोगांशी लढण्याची शक्ती वाढते. हे खाल्ल्याने शेळीची करडे सहजासहजी आजारी पडत नाहीत. त्याचबरोबर शेळ्यांच्या मृत्यूचे प्रमाणही कमी होते. शेळीपालनात सर्वाधिक नुकसान शेळ्यांच्या मृत्यूमुळे होते, त्यामुळे त्यांची काळजी सातत्याने घेतली पाहिजे.

# अद्रक पिकातील सड येणाचे मुख्य कारणे व त्यावरील उपाय

अद्रक पिकावर सड येणे ही शेतकऱ्यांसाठी अत्यंत चिंताजनक समस्या आहे, ज्यामुळे उत्पादनात घट येते आणि आर्थिक नुकसान होऊ शकते. हा रोग प्रामुख्याने बुरशी पिथियम व फ्युजॅरियम, सुत्रकृमी, किंवा  कंदमाशी यांच्यामुळे होतो पण काळजी करू नका या समस्येवर तुम्ही योग्य पावले उचलून प्रभावी उपाय करू शकता.

कंद माशी नियंत्रण : अद्रक/आले पिकामध्ये कंद माशीचा प्रादुर्भाव दिसून येतो. ही माशी उघड्या गड्ड्यांमध्ये शिरून त्याच्यावर उपजीविका करतात आणि आल्याच्या बांडीला डंक मारून बांडी शेंड्या पासून ते बुडख्यापर्यंत वाळून जाते. असे दिसून आल्यास समजून जावे की १०० % डंक माशीचा प्रादुर्भाव आहे.

मुख्य लक्षणे : पानांचे रंग बदलणे – पानांवर पांढरे किंवा तपकिरी डाग दिसणे. पानांचा कुडकुडणे: पानांच्या काठावर वाळलेल्या किंवा कुडकुडलेल्या लक्षणांचा आढळ. कंदांचा सडणे: कंदांमध्ये गडद रंग किंवा सडलेली भाग आढळणे. अवशिष्टांचे प्रमाण वाढणे: अद्रकाच्या कंदामध्ये गड्डा तयार होणे किंवा कुरूप होणे. अवस्था निस्तेज होणे: पिकाची सामान्य वाढ कमी होणे.





उपाययोजना : फेनप्रोपॅथ्रिन ३०% इ.सी. (३० मिली प्रती पंप) + टेबुकोनाझोल ५०%+ ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५% (१० ग्राम प्रती पंप). कंद माशी संध्याकाळी शेतात आढळून येते त्यासाठी फवारणी संध्याकाळीच करावी जेणेकरून चांगला परिणाम झालेला दिसेल.

पिथियम व फ्युजॅरियम बुरशी नियंत्रण : पिथियम नावाची बुरशी पळणारी बुरशी असते ती आपल्या शेतात आली तर प्लॉट पाळायला सुरु करतो. एका रात्रीमध्ये प्लॉटला बुरशी विळखा घालू शकते इतकी ही बुरशी हानिकारक आहे. ह्या बुरशीला वेळीच आळा घालणे गरजेचे आहे.

दुरसी बुरशी म्हणजे फ्युजॅरियम : ही बुरशी पळणारी बुरशी नसून पण तितकीच हानिकारक बुरशी आहे. पानांच्या सुकण्यास, कुजण्यास आणि अखेरीस पूर्ण पिकाच्या नाशास ही कारणीभूत ठरते. पाण्याच्या जास्त प्रमाणामुळे किव्वा खराब निचरा असलेल्या मातीमुळे ही बुरशी जोमाने वाढते.

अद्रक पिकांमध्ये बुरशी येण्याची लक्षणे : पानांवर पांढरे किंवा तपकिरी डाग दिसायला लागतात. कंदांमध्ये गडद, नरम भाग येतात, ज्यामुळे ते सडतात. पिकाची सामान्य वाढ थांबते किंवा कमी होते. कंदांचा आकार बदलतो आणि ते अस्वच्छ दिसतात. कंदांमध्ये सडपातळपणा येतो. उपाययोजना : मेटालॅक्सिल ३५% + कॉपर ऑक्सिक्लोराईड ५०% + ३% बेंफेन्थ्रीन आणि ३०% क्लोरोपायरीफॉस ईसी +कासुगामाइसिन ३% एसएल. सूत्रकृमी हे अद्रक पिकांसाठी महत्त्वाचे नुकसान करणारे कीड आहेत. या सूत्रकृमी प्रभाव पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर होतो. खालील माहिती सूचनात्मक आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# नववर्षाला आनंदाची गुढी, वाहन विक्री तेजीत

## चारचाकी-दुचाकींची विक्रमी खरेदी, ला सर्वाधिक पसंती, जाणून घ्या काय म्हणतात ग्राहक!

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

गुढीपाडवा म्हणजे मराठी नववर्षाची सुरुवात आनंद, उत्साह आणि नवीन गोष्टींचा आरंभ करण्याचा दिवस. या दिवशी घरात गुढी उभारली जाते, सण साजरा केला जातो आणि अनेक जण नवीन गोष्टींची खरेदी करतात. त्यात सर्वाधिक उठून दिसते ती म्हणजे नवीन वाहनांची खरेदी. दरवर्षी गुढीपाडव्याच्या दिवशी दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या शोरूममध्ये मोठी गर्दी पाहायला मिळते. काहीजण महिनाभर आधीच बुकिंग करून ठेवतात, तर काहीजण या शुभ दिवशीच शोरूममध्ये जाऊन वाहन घेण्याचा निर्णय घेतात. शुभ मुहूर्त आणि नवीन वर्षाची चांगली सुरुवात या भावनेतून ही परंपरा वर्षानुवर्षे चालत आली आहे. या दिवशी अनेक कुटुंबांसाठी वाहन खरेदी ही केवळ गरज नसून, एक भावनिक क्षण असतो. काहींसाठी हे पहिले वाहन असते, तर काहींसाठी वर्षानुवर्षे पाहिलेले स्वप्न पूर्ण होण्याचा दिवस असतो. वाहन घेताना नारळ फोडणे, फुलांची सजावट करणे आणि विधीपूर्वक पूजा करणे, या सगळ्या गोष्टी त्या क्षणाला अधिकच खास बनवतात. शोरूममध्येही या दिवशी खास ऑफर्स, सवलती आणि आकर्षक योजना दिल्या जातात. त्यामुळे ग्राहकांसाठी हा दिवस अधिकच खास ठरतो. या पार्श्वभूमीवर आम्ही छत्रपती संभाजीनगरमधील काही ग्राहकांशी संवाद साधला..



यंदा इलेक्ट्रिक वाहनांबाबत ग्राहकांचा प्रतिसाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सुमारे ८० टक्के चौकशा या ईव्हीबाबत होत आहेत. आखाती देशांतील तणावामुळे पेट्रोल दरवाढीची शक्यता आणि वाढते प्रदूषण लक्षात घेता ग्राहक मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक वाहनांकडे वळत आहेत, अशी माहिती विक्रेत्यांनी दिली. ''हे आमचं स्वप्न होतं. गाडी घेताना आमच्या तिन्ही पिढ्या- आजोबा, वडील आणि नातू-एकत्र होते, त्यामुळे हा क्षण आयुष्यभर लक्षात राहील,'' असे त्यांनी सांगितले. एका महिलेने नवी चारचाकी घेतल्यानंतर सांगितले, ही माझी खूप दिवसांची इच्छा होती. मराठी नववर्षाच्या मुहूर्तावर ती आज पूर्ण झाली,'' असे त्यांनी सांगितले. यंदा ऑटोमोबाइल क्षेत्रातील वाढ ही केवळ मुहूर्तामुळे नाही, तर जीएसटी दरातील कपातीमुळेही झाली आहे. छोट्या गाड्या आणि दुचाकींवरील जीएसटी कमी झाल्याने मध्यमवर्गीयांसाठी वाहन खरेदी अधिक सुलभ झाली आहे. तसेच इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांचा कल मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक वाहनांकडे वळताना दिसत आहे. मोठ्या गाड्यांच्या वाढत्या ट्रेंडमुळे एसयूव्ही सेगमेंटमध्ये सुमारे २५ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. यंदा दुचाकी वाहनांवरील जीएसटीमध्ये झालेल्या कपातीमुळे सर्वसामान्यांचे दुचाकीचे स्वप्न साकारणे सोपे झाले आहे. यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दुचाकींच्या विक्रीत १५ ते २० टक्क्यांची लक्षणीय वाढ होण्याची शक्यता असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. जीएसटी कमी झाल्यामुळे ५ वर्षांत पहिल्यांदाच दुचाकी विक्रीत १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. पाडव्याला २ हजार दुचाकींची विक्री होईल, यात १२ ते १५ टक्के ईव्ही गाड्या आहेत. अशी माहिती ऑटोमोबाइल डीलर राहुल मिश्रीकोटकर यांनी दिली. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर छत्रपती संभाजीनगरच्या बाजारपेठेत चैतन्याचे वातावरण पाहायला मिळाले. वाहनांसह गृहखरेदी आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंमध्येही ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. शहरातील रिअल इस्टेट, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाइल आणि सराफा या चार प्रमुख क्षेत्रांतील आकडेवारीनुसार, एका दिवसात सुमारे ७९० कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. त्यात रिअल इस्टेट क्षेत्रातच ४०० कोटींची विक्री नोंदवली गेली, जे शहराच्या वाढत्या आर्थिक क्षमतेचे प्रतीक मानले जात आहे. गुढीपाडवा हा केवळ सण नाही, तर प्रत्येकाच्या आयुष्यात नवे पर्व सुरू करणारा- आशा, आनंद आणि नव्या स्वप्नांनी भरलेला एक खास क्षण आहे.

---

## जालन्यात वर्षभरात ४.५ मिलियन टन सळईचे विक्रमी उत्पादन

### वर्षभरात आरोग्य, कृषी,शिक्षण क्षेत्रात उभारली यशाची गुढी

जालना। प्रतिनिधी

जालनेकरांनी गेल्या वर्षभरात आपल्या कर्तृत्वाने मोठी मजल मारत यशाची गुढी उभारली आहे. विशेषत : स्टील सिटीमध्ये वर्षभरात ४.५ मिलियन टन सळईचे उत्पादन घेण्यात आले असून हा एक विक्रम आहे. दुसरीकडे आरोग्य, कृषी आणि शिक्षण क्षेत्रात मोठी भरारी घेतली असून राज्यातील पहिले इन्क्येुबशन सेंटर, देशातील पहिला ड्राय पोर्ट गेल्या वर्षभरातच मार्गी लागला आहे. त्याशिवाय सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीचा फटका बसूनही शेती क्षेत्रात चांगले उत्पादन झाले आहे. जिल्ह्याची ओळख असलेल्या दगडी ज्वारीला विशिष्ट भौगोलिक ओळख मिळाली आहे. त्यामुळे ज्वारीला रेकॉर्डब्रेक ४६०० रुपये क्विंटलपर्यंत दर मिळाला आहे. जालना औद्योगिक वसाहत परिसरात मॅजिकचे पहिले इन्क्युबेशन सेंटर याच वर्षी कार्यान्वित करण्यात आले आहे.

नावीन्यपूर्ण संकल्पना व प्रयोगांना व्यावसायिक स्वरूपात बदलण्यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरत आहे. स्कूल कनेक्ट उपक्रमामुळे तंत्रनिकेतनच्या प्रवाशांनी या वर्षी विक्रमी टप्पा गाठला. जिल्ह्यात सीएमश्री उपक्रमामुळे काही शाळा मॉडेल स्कूल म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले आहेत. विविध कंपन्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी जॉब फेअर, कॅम्पस मुलाखती घेतल्या. यातून अनेक युवकांना रोजगार मिळाला. २०२४ मध्ये सुरू झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आता पदव्युत्तर शिक्षणासाठी मंजूरी मिळाली आहे. या महाविद्यालयाकडे आता जिल्हा रुग्णालय हस्तांतरित करण्याची प्रक्रिया गेल्या काही वर्षांत सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हा रुग्णालयाला आणखी काही तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध होतील. खासगी रुगणालयांनीही हृदयविकारावर अत्याधुनिक उपचार पद्धती शहरात लागू केल्या आहेत. नव्या रुग्णालयांमुळे जिल्ह्याच्या हॉस्पिटलमधील बेडची संख्या वाढली आहे. देशातील पहिला ड्रायपोर्ट सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला. तब्बल पाचशे एकरवर हा पोर्ट असून तो रेल्वेने जोडला आहे. या पोर्टचे संचालन करण्यासाठी कंपनी निश्चित करण्यात आली आहे. आता याचे काम सुरू होणार आहे. गेल्या वर्षभरात जवळपास ४५ लाख टन सळईचे उत्पादन झाले. देशातील स्क्रॅप आयातीत जालन्याचा वाटा वाढत चालला आहे. त्यामुळे स्टील उद्योगांसाठी या वर्षीची ही आजवरची सर्वात चांगली कामगिरी ठरली आहे. त्याशिवाय औद्योगिक क्षेत्राचा विस्तार होण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या आहेत. जिल्ह्यात उत्पादित केल्या जाणाऱ्या दगडी ज्वारीला विशिष्ट भौगोलिक ओळख मिळाली आहे. यामुळे या पिकाला विशेष ओळख आणि कायदेशीर सरंक्षण मिळणार आहे. त्यामुळे ज्वारीला चांगला दर मिळत असून या वर्षी तब्बल ४६ रुपये किलोपर्यंत ज्वारीला दर मिळाला आहे. अनेक शेतकरी खजूर उत्पादनात पुढे आले आहेत. त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळाले आहे. कमी पाणी व कमी खर्चातील हा प्रयोग जिल्ह्यात यशस्वी होत आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये अवकाळी पावसाचा फटका बसला तरी सोयाबीनचे विक्रमी उत्पादन झाले आहे.

---

## पूर्णा नदीपात्रात ठेकेदाराकडून अवैध रेती उत्खनन

### जेसीबी पोकलॅनवर बंदी घाला भाऊसाहेब गोरे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पूर्णा नदीपात्रात सुरू असलेल्या रेती उत्खननाच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि अवैध प्रकार सुरू असल्याचे दिसून येत असून. रेती माफिया या प्रकरणात जेसीबी, पोकलॅन यांसारख्या यंत्रांचा सर्रास वापर करून अवैधरित्या ठेकेदाराकडून विना पावतीचा रेती उपसा मोठ्या प्रमाणात केला जात आहे.



यासह विविध तक्रारींचे निवेदन जिल्हा नियोजन समिती विशेष निमंत्रित सदस्य तथा खरेदी विक्री संघ मंठा तालुका अध्यक्ष भाऊसाहेब गोरे यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना दिले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, मंठा तालुक्यातील रेती उत्खननासाठी संबंधित कार्यालयामार्फत टेंडर प्रक्रिया राबविण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात बहुतांश रेती पॉईंटवर नियमबाह्य पद्धतीने उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. निविदेत मंजूर करण्यात आलेल्या खोलीपेक्षा अधिक खोलीपर्यंत यंत्रांच्या सहाय्याने उत्खनन केले जात असल्यामुळे नदीपात्राचा समतोल बिघडत आहे. तसेच वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक रेती भरून वाहतूक केली जात असल्याचेही उघड झाले आहे. एकाच पावतीवर अनेक फेऱ्या मारणे,२ ब्रासच्या पावतीवर ४ ब्रास, ४ ब्रासच्या पावतीवर ६ ब्रास आणि त्यापेक्षाही अधिक रेतीची वाहतूक केली जात असल्याचे प्रकार सर्रास घडत आहेत. याशिवाय, काही प्रकरणांमध्ये वाहन रेतीघाटात अडकले असल्याचे खोटे कारण दाखवून जेसीबी किंवा पोकलॅन यंत्रांचा वापर करून प्रत्यक्षात अवैध उत्खनन केले जात असल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे. रेती उत्खननाची ईटीएसमार्फत चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अवैधरित्या रेती उत्खलनामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून, नदीपात्रात खोल उत्खनन केल्यामुळे परिसरातील विहिरींच्या पाण्याची पातळी लक्षणीयरीत्या घटली आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या शेतातून रस्ते तयार करून त्यांच्यावर दबाव टाकण्यात येत असल्याचेही समोर आले आहे. शेतकरी तक्रार करण्यासाठी पुढे आल्यास त्यांच्या ७/१२ वर बोजा टाकण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

---

## अंगणवाडी सेविकांचा गाव बालविवाहमुक्त करण्याचा निर्धार

जामखेड। प्रतिनिधी

बालविवाह ही एक सामाजिक समस्या आहे. तिच्या निर्मूलनासाठी प्रशासकीय यंत्रणा आणि सामाजिक संस्थांनी सामूहिक लढा देणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जामखेड येथे आयोजित बालविवाह प्रतिबंध कार्यशाळेत प्रमुख वक्त्यांनी केले. या कार्यशाळेला उपस्थित २२५ अंगणवाडी सेविका आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी बालविवाह मुक्त समाज घडवण्याचा निर्धार व्यक्त केला.या मोहिमेत सर्व स्तरातील नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून बालविवाहाची माहिती मिळाल्यास त्वरित प्रशासनाला कळवावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

स्नेहालय उडान बालविवाह प्रसतिबंधक अभियान,जिल्हा महिला व बालविकास विभाग,जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि बालविकास प्रकल्प अधिकारी पंचायत समिती जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'उडान बालविवाह प्रतिबंध अभियाना'अंतर्गत या विशेष जाणीव जागृती कार्यशाळेचे आयोजन महावीर मंगल कार्यालय जामखेड येथे केले होते. यावेळी विचार मंचावर बालविकास प्रकल्प अधिकारी हिरा सानप, चाइल्ड लाइन केंद्र समन्वयक महेश सूर्यवंशी,स्नेहालय उडान प्रकल्पाचे समन्वयक योगेश अब्दुले,महिला सक्षमीकरण केंद्राच्या पूजा ढेरे, विपला फाउंडेशनच्या ॲड. शुभांगी रोहकले, पर्यवेक्षक आर. एस. जावळे, व्ही. पी. वाघमारे, अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सावित्रा कदम,राहुल कांबळे आदी उपस्थित होते.

---

## वडीगोद्री फाटा पाचोड टोल नाका परिसरात १७ गॅस सिलेंडर जप्त

अंबड। प्रतिनिधी

जिल्हा प्रशासन व पुरवठा विभागाच्या वतीने अवैध साठेबाजी आणि पुरवठा साखळीतील अनियमिततेवर नियंत्रण मिळवण्यासाठी आज, १८ मार्च २०२६ रोजी मोठी कारवाई करण्यात आली. अंबड शहर, वडीगोद्री फाटा आणि पाचोड टोल नाका परिसरात टाकलेल्या छाप्यांमध्ये १७ गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन सदर कारवाई जालना जिल्ह्याच्या जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर तसेच अंबडचे तहसीलदार विजय चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रशासनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.



कारवाईचे स्वरूप आणि पथक अंबडचे पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांनी आपल्या विशेष पथकासह ही मोहीम राबवली. या पथकामध्ये तलाठी सतीश शिंदे आणि अविनाश देवकर यांचा समावेश होता. पथकाने वडीगोद्री फाटा आणि पाचोड टोल नाका या दोन महत्त्वाच्या ठिकाणी कसून तपासणी केली असता, नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले. त्याठिकाणी कारवाई करत पथकाने १७ गॅस सिलेंडर ताब्यात घेतले आहेत. ''पुरवठा विभागामार्फत करण्यात आलेली ही कारवाई नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध एक कठोर इशारा आहे. गॅस सिलेंडरची अवैध विक्री किंवा साठेबाजी खपवून घेतली जाणार नाही. भविष्यातही अशाच प्रकारची तपासणी आणि कारवाई सुरू राहील,'' असे पुरवठा अधिकारी किरणकुमार खांडेभराड यांनी यावेळी स्पष्ट केले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, जप्त केलेल्या मालाबाबतचा अधिकृत अहवाल आणि पुढील कायदेशीर प्रक्रिया प्रशासनाकडून पूर्ण केली जात आहे.

---

## स्मार्ट थ्रेशर रोखणार मळणी यंत्रावरील मजुरांचे अपघात

### इडोळीच्या विद्यार्थ्यांच्या उपकरणाला राज्यात पहिला क्रमांक

हिंगोली। प्रतिनिधी

राज्यात आता मळणी यंत्रावर काम करतांना शेजमजूरांचे अपघात रोखणे शक्य होणार असून त्यासाठी इडोळी (ता.हिंगोली) येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी टू स्टेज स्मार्ट थ्रेशर हे उपकरण तयार केले आहे. या उपकरणाला राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला आहे. राज्यात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे व लिडरशिप फॉर इक्विटी यांच्या वतीने ता. १६ मार्च ते ता. १८ मार्च या कालावधीत राज्यस्तरीय हॅकेथॉन स्पर्धा घेण्यात आली. तत्पुर्वी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करून माहिती घेण्यात आली होती. त्यानुसार हिंगोली तालुक्यातील इडोळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता सातवी वर्गातील विद्यार्थीनी तेजल जाधव, वेदीका जाधव, अनुराधा टेकाळे यांनी शिक्षकी दीपाला ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी करून उपकरणाची माहिती दिली.



त्यानंतर त्यांना आयोजकांकडून विविध आठ ते दहा प्रकारचे सेन्सर व इतर पार्टचा पुरवठा करण्यात आला. या सेन्सरमध्ये कोडींग करून व पार्टच्या माध्यमातून विद्यार्थीनींनी स्मार्ट थ्रेशर हे उपकरण तयार केले. सध्या पिकांची मळणी करतांना माळणी यंत्रात पिकाची टाकतांना थोडीही चूक मजूरांच्या जिवावर बेतते. यामुळे दरवर्षी मोठ्या संख्येने उपघात होतात. सदर अपघात रोखण्यासाठी विद्यार्थीनींनी स्मार्ट थ्रेशर तयार केले. यामध्ये टू स्टेज लावण्यात आल्या आहेत. यामध्ये मळणी यंत्रामध्ये हात सुरक्षित अंतराच्या पुढे जात असल्यास लगेचच अलार्म वाजतो व धोक्याची सूचना मिळते तर मळणी यंत्रात सुरक्षित अंतराच्या पुढे गेल्यानंतर अलार्म वाजून मळणी आपोआप बंद पडले. या उपकरणामुळे शेतमजूरांचे अपघात टाळणे शक्य होणार असल्याचे दाखवून देण्यात आले. पुणे येथे ता. १६ ते ता. १८ मार्च या कालावधी झालेल्या हॅकेथॉन स्पर्धेत या उपकरणाचे सादरीकरण करण्यात आले. इडोळी सारख्या ग्रामीण भागातील शाळेने शेतकऱ्याच्या महत्वाच्या समस्येवर तयार केलेल्या उपकरणाला राज्यस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्याबद्दल विद्यार्थीनी तेजल जाधव, वेदीका जाधव, अनुराधा टेकाळे, मार्गदर्शक शिक्षीका दीपाली ढोले यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाणे, शिक्षणाधिकारी आसावरी काळे, केंद्र प्रमुख बी. जी. मुटकुळे, मुख्याध्यापक अशोक देवकर, शिक्षक संजय भक्कड, बंडू पुरी, अनिता जाधव, मनिषा पवार, सतीष कापसे, राजेश्वर पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे हनुमान जाधव, भानुदास जाधव, रामेश्वर टेकाळे, विठ्ठल जाधव, शिवाजी टेकाळे, वैजनाथ जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

---

## भौतिक प्राप्तीपेक्षा अध्यात्मिक प्राप्ती मिळविणे म्हणजे परमार्थ होय-योगानंद महाराज



मंठा। प्रतिनिधी

जगी जीवनाचे सार घ्यावे जाणूनी सत्वर
जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो रे ईश्वर ।।

या संतउक्ती प्रमाणे आपण जे पेराल तेच उगवेल त्यामुळे भौतिक सुखाच्या मागे लागण्यापेक्षा अध्यात्म्याची प्राप्ती करणे म्हणजेच परमार्थ होय असा उपदेश परमपूज्य तपस्वी श्री योगानंद महाराज यांनी दिला. मंठा तालुक्यातील श्री योगानंद बाबा आश्रम बुगा नाईक तांडा दहिफळ खंदारे येथे श्रीक्षेत्र भवानीनगर ते तीर्थक्षेत्र पोहरादेवी पायी दिंडी सोहळ्याचे आगमन झाल्यानंतर पालखीची वाजत गाजत मिरवणूक काढून सर्वांनी मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी परमपूज्य तपस्वी श्री योगानंद महाराज यांनी उपदेश केला की, आई-वडिलांनी मुलांना चांगले संस्कार दिले पाहिजेत, मनुष्याने जीवनात येऊन परमार्थ करावा, परमेश्वराचे नामस्मरण करावे यातूनच भगवंताची प्राप्ती होते असे सांगितले. यावेळी दिंडीचे अध्यक्ष साहेबराव महाराज यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला व वारकरी मंडळींचेही स्वागत करण्यात आले. यावेळी श्री ह भ प साहेबराव महाराज, विजय राठोड, पांडुरंग राठोड, आबाराव जाधव, कु. अंजली जाधव यांच्या भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला सावरगावच्या मच्छिंद्रनाथ गडावर लाखो भाविकांची गर्दी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगावजवळील गर्भगिरी पर्वतरांगांमध्ये वसलेल्या मच्छिंद्रनाथ गडावर गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला लाखो भाविकांनी सद्गुरु मच्छिंद्रनाथांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेतले. नवनाथांपैकी एक असलेल्या मच्छिंद्रनाथांच्या या पवित्र स्थळावर महाराष्ट्रासह देशभरातून भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते.





वर्षातून एकदाच दर्शनासाठी खुली होणारी ही संजीवन समाधी पाहण्यासाठी पहाटेपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मंदिर परिसरापासून सुमारे १० किलोमीटर अंतरावर वाहनांची पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती. दुचाकी व चारचाकी वाहनांचा मोठा ओघ पाहायला मिळाला.

अंभोरा पोलीस ठाण्याचे पीआय मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शिस्तबद्ध नियोजनामुळे कोणतीही अडचण न येता भाविकांना शांततेत दर्शन घेता आले.

## चोख बंदोबस्तात समाधी दर्शन सुरळीत

दरम्यान, आमदार सुरेश धस यांच्या नियोजनामुळे समाधी दर्शन प्रक्रिया सुलभ करण्यात आली. काही पारंपरिक रूढींमध्ये बदल करून दर्शन लवकर खुले केल्याने प्रत्येक भाविकाला समाधीचे दर्शन घेण्याची संधी मिळाली. यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

आष्टी येथील सद्गुरु सेवेकरी मंडळाच्या वतीने सुमारे ५० हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. दाल-खिचडी, बुंदीचे पाकीट व पाण्याच्या बाटल्या वाटप करण्यात आले. तसेच बेलगाव येथील गाई मंदिर ट्रस्टतर्फे गेल्या १४ वर्षांप्रमाणे यंदाही सायंकाळी चहा-बिस्किटांची व्यवस्था करण्यात आली. मंदिर परिसर सद्गुरु मच्छिंद्रनाथ महाराज की जय, अलख निरंजन आदेश अशा जयघोषांनी दुमदुमून गेला होता. रात्री फटाक्यांची आतिषबाजी व रोषणाईने संपूर्ण गड उजळून निघाला, ज्यामुळे भक्तिमय वातावरणाची अनुभूती भाविकांना मिळाली.



### माजलगावात जिल्हाधिकाऱ्यांचे गाडी दोन तास अडवली

# थकीत ऊस बिलासाठी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ठिय्या आंदोलन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील थकीत ऊस बिलाच्या प्रश्नावरून माजलगावात युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांची गाडी दोन तास अडवून ठिय्या आंदोलन केले.दि १८ मार्च बुधवार रोजी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर युवा शेतकरी संघर्ष समितीने हे आंदोलन केले.

माजलगाव मतदारसंघातील तीन साखर कारखाने तसेच गूळ युनिटकडून शेतकऱ्यांचे ऊसाचे बिल थकीत आहे. जनता दरबारसाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन येताच संतप्त शेतकऱ्यांनी त्यांचे वाहन अडवले. तसेच ठिय्या मांडून दुपारी १२.३० ते २.३० दरम्यान आंदोलन केले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी धाव घेत आंदोलकांशी चर्चा केली.दीर्घ चर्चेनंतर प्रशासनाने थकीत ऊस बिलाबाबत तातडीने निर्णय घेण्याचे आणि शेतकऱ्यांचे पेमेंट थकवणाऱ्या संबंधित साखर कारखान्यांवर आणि गुळ युनिवटर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.या आश्वासनानंतर शेतकऱ्यांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस भाई नारायण गोले पाटील,कॉम्रेड मोहन जाधव, अजय राऊत, नामदेव सोजे, यांच्यासह अनेक शेतकरी व युवा शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

# महसूल विभागाची ढिलाई; पाटोद्यातील ६६ शेतकरी 'पीएम किसान'पासून वंचित

पाटोदा । प्रतिनिधी

लँड सीडिंग प्रक्रियेत गंभीर निष्काळजीपणा व जबाबदारीपासून पळ काढणाऱ्या महसूल विभागाच्या कारभारामुळे पाटोदा तालुक्यातील तब्बल ६६ शेतकरी 'पीएम किसान सन्मान निधी' योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. प्रशासनाच्या हलगर्जीपणाचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत असून शेतकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा करूनही महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याची तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ७/१२ उताऱ्यांतील नोंदी अद्ययावत करण्यास टाळाटाळ, तांत्रिक कारणांची आड घेऊन कामे प्रलंबित ठेवणे, तसेच जबाबदारी झटकण्याचे प्रकार सर्रास सुरू असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.दरम्यान, महसूल व कृषी विभागांच्या ढकलाढकलीत शेतकरी भरडले जात आहेत. शेतकऱ्यांननी तहसिल व कृषी कार्यालयाचे उंबरठे झिजवूनही न्याय मिळत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी व्यक्त केली.यामुळे पात्र असूनही शेतकऱ्यांच्या खात्यात 'पीएम किसान'चा हप्ता जमा होत नाही. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे.शेतकऱ्यांनी प्रशासनाला इशारा देत तात्काळ लँड सीडिंग प्रक्रिया पूर्ण करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे.






























This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भोंदूबाबा अशोक खरातचा व्हीएसआर कंपनीशी संबंध आहे का?

## अजितदादांच्या घराबाहेर झालेल्या पुजेचं कनेक्शन काय? मिटकरींचे सवाल

पुणे । प्रतिनिधी

भोंदूबाबा असणारा कॅप्टन अशोक खरात याचा व्हीएसआर कंपनीशी काय संबंध आहे का? याची चौकशी सरकारने करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. अजित पवारांच्या बारामती आणि मुंबईतील घराबाहेर झालेल्या आघोरी पूजेचे कनेक्शन कॅप्टन अशोक खरातसोबत आहे का? याची देखील चौकशी व्हावी असे मिटकरी म्हणाले. आमदार अमोल मिटकरी

कॅप्टन खरात याचा 'व्हीएसआर कंपनी'च्या विमानासोबत फोटो केला ट्विट

राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी नाशिकचा भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात संदर्भात एक खळबजनक ट्विट केलं आहे. या ट्विटमध्ये आमदार मिटकरी यांनी कॅप्टन खरात याचा 'व्हीएसआर कंपनी'च्या विमानासोबत एक फोटो ट्विट केला आहे. कॅप्टन खरात याचे 'व्हीएसआर कंपनी'चा मालक व्ही. के. सिंग यांच्याशी काही संबंध आहे काय?, याचा तपास करण्याची मागणी केली आहे. यासोबतच अजित पवारांच्या



बारामती आणि मुंबई येथील निवासस्थानाबाहेर केलेल्या आघोरी पूजेशी कॅप्टन खरात याचा संबंध आहे का?, याचा तपास घेण्याची मागणी केलीयै. कॅप्टन खरातसंदर्भात चौकशीसाठी नियुक्त केलेल्या 'एसआयटी'ने या दृष्टीनेही तपास करावा, अशी विनंती आमदार मिटकरी यांनी सरकारकडे केली आहे. या तपासातून नक्कीच अजित पवारांच्या विमान अपघाताबद्दल महत्वाचे धागेद्वारे मिळतील, असा विश्वासही आमदार अमोल मिटकरी यांनी व्यक्त केला आहे.

अशोक खरात याच्याविरुद्ध सरकारवाडा पोलीस ठाणे येथे अत्याचाराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३५ वर्षीय महिलेवर गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. आरोपी अशोक खरात हा सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष आहे. तो मर्चंट नेव्हीतून निवृत्त झाल्यानंतर 'कॉस्मॉलॉजी एक्स्पर्ट' आणि अंकशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध झाला होता. अनेक राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक त्याच्याकडे मार्गदर्शनासाठी जात असल्याची माहिती समोर आली आहे. तर या प्रकरणाला राजकीय वळणही मिळाले आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी अशोक खरातची पाद्यपूजा केल्याचा फोटो समोर आल्यानंतर त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे.

नाशिक पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या युनिट १ ने अशोक खरातला अटक करण्यासाठी वेगळाच डाव आखला होता. आरोपी राहत असलेल्या परिसरात चोर शिरल्याचा बनाव केला. चोराला पकडण्यासाठी पोलीस परिसरात झडती घेत असल्याचे सांगत पथकाने विविध ठिकाणी तपास सुरू केला. याचाच भाग म्हणून काही पोलिसांनी खरातच्या घराचीही तपासणी सुरू केली. दरम्यान, घरात उपस्थित असलेल्या अशोक खरातला पाहताच पोलिसांनी क्षणार्धात कारवाई करत त्याच्या मुसक्या आवळल्या. या अनपेक्षित हालचालीमुळे आरोपीला पळून जाण्याची संधीच मिळाली नाही.



# पीएमपीमध्ये बढतीचा 'झोल'?

## महापालिकेच्या मुख्यसभेत काँग्रेसचं आंदोलन

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड ( पीएमपीएमएल) मधील बढती गैरव्यवहार प्रकरणाचा अहवाल जाहीर करावा, तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी कॉग्रेसने पालिकेच्या मुख्यसभेत बुधवारी आंदोलन केले. यावेळी पीएमपीचे माजी व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांच्या विरोधात घोषणा देत कारवाईची मागणी केली.

कॉग्रेसचे गटनेते चंदू जगताप यांच्यासह, शहराध्यक्ष अरविंद शिंदे, प्रशांत जगताप आणि अन्य नगरसेवक उपस्थित होते. यावेळी आंदोलकांनी महापौरांसमोर कारवाईच्या मागणीचे फलकही झळकाविले. त्यावेळी विरोधीपक्ष नेते निलेश निकम यांनी पुढील आठ दिवसात खास सभा घेण्याची मागणी केली.

तसेच पीएमपीला महापालिका मोठ्या प्रमाणावर संचलनतूट देत असतानाही पुणेकरांना योग्य सुविधा मिळत नसल्याची तक्रार केली. महापालिकेने अद्याप पीएमपीसाठी संचालक नेमलेला नसल्याने संचालक मंडळाची बैठक झालेली नाही. त्यामुळे विशेष सभा आठवड्यात घेता येणार नाही. समिती सदस्य नेमल्यानंतर ही सभा घेतली जाणार असल्याचे आश्वासन यावेळी महापौरांनी आंदोलकांना दिले.

# माजी मंत्र्याचा पुतण्याचा बारामतीजवळ भीषण अपघात; फॉर्च्युनर कारला कंटेनरची धडक, कारचा अक्षरशः चेंदामेंदा

सोलापूर-पुणे महामार्गावर बारामतीजवळ एक भीषण अपघाताची घटना घडलीय. गुरुवारी मध्यरात्री झालेल्या या अपघातात माजी मंत्र्याचा पुतण्याच्या फॉर्च्युनर कारला भरधाव कंटेनरने धडक दिली आहे. भाजपमधील पक्षप्रवेश केल्यानंतर घरी परतताना धनंजय सावंत यांच्या गाडीला कंटेनरने धडक दिली आहे. मात्र या भीषण अपघातातून माजी जि.प. उपाध्यक्ष धनंजय सावंत हे थोडक्यात बचावले आहे. मात्र या भीषण अपघातात कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला आहे.



भाजप प्रवेशावरून परतताना फॉर्च्युनर कारला कंटेनेरची धडक

मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय सावंत हे आपल्या काही सहकाऱ्यांसोबत फॉर्च्युनर कारमधून धाराशिवकडे जात होता. मध्यरात्री उशिरा बारामतीपासून जवळच असलेल्या भिगवणजवळ त्यांच्या कारला भीषण अपघात झाला. त्यांच्या कारला भरधाव कंटेनरने जोरदार धडक दिली आहे. यात कारचं मोठं नुकसान झालं आहे. भाजप प्रवेशावरून परतताना धनंजय सावंत यांच्या गाडीला कंटेनेर ने धडक दिली. या भीषण अपघातातून माजी जि.प. उपाध्यक्ष धनंजय सावंत बालंबाल बचावलेत. भिगवणजवळील डाळज २ गावाच्या जवळ हा अपघात झाला. यात फॉर्च्युनरच्या चालकाच्या बाजूचा पूर्ण भाग चक्काचूर झालाय. सुदैवाने अपघातात धनंजय सावंत यांना कोणतीही गंभीर इजा झाली नाही, मात्र किरकोळ मार त्यांच्या सहकाऱ्यांना बसलाय. यात गाडीचा चालक आणि सुरक्षारक्षकही किरकोळ जखमी झाले आहे.

शिवसेना आमदार धनंजय सावंत यांचे धनंजय सावंत हे पुतणे आहेत. नुकतेच त्यांनी सहकुटुंब भाजपमध्ये प्रवेश केलाय. जिल्हा परिषद निवडणूक अपक्ष लढलेले धनंजय सावंत यांनी कुटुंब आणि कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. धाराशिवमध्ये शिंदेंच्या शिवसेनेला खिंडार पडल्याचं बोललं जात असून धनंजय सावंत यांचा कार्यकर्त्यांसह शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केलाय. मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, भाजप आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या उपस्थितीत हा भाजप प्रवेश सोहळा पार पडलाय. धनंजय सावंत यांनी त्यांच्या पत्नी आणि मुलासह सहकुटुंब भाजपमध्ये पक्ष प्रवेश केलाय. जिल्हा परिषद निवडणूक भाजपच्या पाठिंबावर अपक्ष निवडून आल्यानंतर आता थेट भाजपमध्ये सावंत दाखल झाले आहे.

# पुणे आरटीओचा खोळंबा! दोन आठवड्यांपासून वाहनांची फिटनेस चाचणी बंद; वाहन चालकांचा संताप

पुणे : मागील दोन आठवड्यापासून पुण्यातील वाहनांची फिटनेस चाचणी बंद आहे. परिणामी व्यावसायिक वाहनांचे फिटनेस आणि पासिंग रखडले असून, त्याचा फटका वाहनचालक आणि मालकांना बसत असून, राज्य सरकारने तात्काळ ही चाचणी सुरू करावी, अशी मागणी वाहतूक संघटनांकडून केली जात आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने व्यावसायिक वाहनांसाठी स्वयंचलित चाचणी केंद्रात (एटीएस) फिटनेस तपासणी अनिवार्य केली आहे. मात्र, राज्यात विविध ठिकाणी एटीएस केंद्रांची उभारणी सुरू असून, त्यामध्ये पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचाही समावेश आहे.



परिणामी केंद्र सुरू नसल्यामुळे फेब्रुवारी महिन्यात वाहनांची फिटनेस चाचणी बंद झाली.

या वेळी वाहनचालक संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर दहा दिवस मोटार वाहन निरीक्षकांमार्फत पूर्वीप्रमाणे फिटनेस तपासणीला सुरवात झाली. मात्र, दि. २ मार्चपासून आदेश न आल्यामुळे मागील दोन आठवड्यांहून अधिक दिवसांपासून ही प्रक्रिया पुन्हा बंद केली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे अंतर्गत दिवे परिसरात स्वयंचलित चाचणी केंद्र उभारले जात आहे.परंतु हे केंद्र पूर्णपणे कार्यान्वित होण्यासाठी किमान दीड ते दोन महिने लागण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या कालावधीत खासगी व्यावसायिक वाहने, मालवाहतूक वाहने, रिक्षा तसेच एसटी महामंडळ आणि पीएमपीच्या काही वाहनांचेही फिटनेस प्रलंबित राहिले आहे.

पुण्यात स्वयंचलित चाचणी केंद्र अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे ते सुरू होईपर्यंत पूर्वीप्रमाणे मोटार वाहन निरीक्षकांमार्फत फिटनेस चाचणी घ्यावी; अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

– बापू भावे, सचिव, रिक्षा फेडरेशन

पूर्वीप्रमाणे मोटार वाहन निरीक्षकांमार्फत फिटनेस चाचणी सुरू व्हावी, याबाबत परिवहन कार्यालयाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. पुढील आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

– स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# पुण्यात भटक्या कुत्र्यांचा हैदोस! महापालिका उभारणार ३ नवे 'डॉग शेल्टर'; २५ कोटींची तरतूद

पुणे । प्रतिनिधी

भटक्या आणि मोकाट कुत्र्यांचा उपद्रव थांबवा, योग्य ती कार्यवाही करावी, अशा मागण्या नगरसेवकांनी बुधवारी महापालिका मुख्य सभेत केल्या. या प्रश्नावर ठोस उपाययोजना करू, असे आश्वासन महापालिका प्रशासनाने दिले आहे. नगरसेविका ऐश्वर्या पठारे, नगरसेवक कुणाल टिळक, धीरज घाटे, प्रिया गदादे, अर्चना पाटील, सभागृह नेते गणेश बिडकर आदींनी भटक्या कुत्र्यांचा प्रश्न गंभीर असल्याबाबत प्रशासनाचे लक्ष वेधले.

मुख्य सभेत आयत्या वेळच्या विषयावर झालेल्या या प्रश्नावरील चर्चेत अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर यांनी प्रशासन करत असलेली कार्यवाही आणि उपाययोजनांची माहिती देऊन ठोस उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. उपमहापौर परशुराम वाडेकर यांनीही हा प्रश्न गंभीर असल्याने तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले. भटक्या आणि मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यांबाबत नगरसेवकांनी चाकण येथील घटनेत कुत्र्यांच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाल्याच्या घटनेचा संदर्भ दिला. कुत्र्यांचा बंदोबस्त केला का करत नाही, लसीकरण आणि नसबंदी करण्याची क्षमता असूनही, त्या वेगाने का होत नाहीत, असे मुद्दे मांडले. घाटे यांनी सारसबागेत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाल्याचे निवेदन प्रशासनाला दिले होते. त्यावर प्रशासनाने कारवाई केली; परंतु या कुत्र्यांना खाद्य देणाऱ्यांवर नियंत्रण आणणे, फिडींग पॉइंट ठरवणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

मोकाट कुत्र्यांविरोधात तक्रार करणाऱ्यांच्या विरोधात प्राणिमित्र नागरिक केंद्रीय संस्थेकडे तक्रार करतात, हे प्रकार थांबणे गरजेचे आहे, असे सदस्यांनी नमूद केले. समाविष्ट गावांत संकरीत मोकाट कुत्र्यांचा प्रश्न गंभीर असल्याचे सांगून ती अधिक हिंस्र असतात असतात, मांसाहार मिळाला नाही, तर ते मानवावर हल्ला करतात, ही गंभीर बाब बिडकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. महापालिकेतर्फे शहराच्या तीन भागांत डॉग शेल्टर उभारण्यात येणार असून, त्यासाठी अंदाजपत्रकात २५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. प्रत्येक शेल्टरमध्ये एक हजार कुत्री ठेवता येतील, एवढी क्षमता असून, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही केली जात आहे.

– पवनीत कौर, अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका

# सोन्याच्या पत्र्यापासून केआरए ज्वेलर्सने घडविली संत ज्ञानेश्वर माऊली यांची फोटो फ्रेम

पुणे । प्रतिनिधी

८८ वर्षांहून अधिक काळ आपली सुवर्ण परंपरा जपणाऱ्या आणि पुण्यातील प्रसिद्ध ज्वेलर्स म्हणून नावलौकिक मिळविलेल्या कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्स अर्थात केआरए ज्वेलर्सच्या वतीने सोन्याच्या पत्र्यापासून संत ज्ञानेश्वर माऊली यांची फोटो फ्रेम घडविण्यात आली आहे.

केआरए ज्वेलर्सचे संचालक विपुल अष्टेकर यांच्या संकल्पनेमधून ही फ्रेम घडविण्यात आली.

संत ज्ञानेश्वरांचे ७५० वी जयंती आणि गुढीपाडवा यांचे औचित्य साधत आळंदी येथील संत श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीतर्फे चैतन्य महाराज लोंढे (कबीर बुवा) यांच्या हस्ते या फ्रेमचे औपचारिक अनावरण आज आळंदी येथे करण्यात आले. समितीचे व्यवस्थापक वीर माऊली हे देखील यावेळी उपस्थित होते.

या फ्रेमविषयी अधिक माहिती देताना विपुल अष्टेकर म्हणाले, संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या प्रतिमेसारखी आणि






सोन्याचा वापर करीत घडविण्यात आलेली कोणतीच फोटो फ्रेम आज बाजारात उपलब्ध नाही हे लक्षात आल्या नंतर केआरए ज्वेलर्सने ही फ्रेम घडविण्याचा निर्धार केला.

सदर फ्रेममध्ये ९९.९% शुद्ध सोन्याच्या पत्र्याचा वापर करीत माऊलींची हुबेहूब प्रतिमा साकारण्यात आली आहे. साधारण २२ इंच रुंदी तर २६ इंच उंची असलेली ही फ्रेम – संत ज्ञानेश्वर माऊलींची फ्रेम स्वरूपात असलेले भारतातील सर्वात मोठ्या फ्रेम पैकी एक फ्रेम आहे हे विशेष.

आज मराठी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी अर्थात गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर या फ्रेमचे अनावरण आळंदी देवस्थान येथे संपन्न झाले असून केआरए शोरूममध्ये विविध आकारांत सदर फ्रेम ग्राहकांसाठी विक्रीस उपलब्ध आहेत, असेही अष्टेकर म्हणाले.

### संशयाचा भयानक शेवट! वानवडीत १९ वर्षीय तरुणाची बॅटने ठेचून हत्या

पुणे : पहाटेच्या भयाण शांततेत अचानक कुत्र्यांच्या भुंकण्याने जीवाच्या आकांताने दोघे मित्र पळू लागले. त्याचवेळी चोर असल्याच्या संशयातून या तरुणांचा टोळक्याने पाठलाग केला. दुर्दैवाने पळताना १९ वर्षीय तरुणाचा पाय घसल्याने तो टोळक्याच्या तावडीत सापडला. टोळक्याने बॅट आणि लाथा-बुक्क्यांनी केलेल्या बेदम मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना वानवडी परिसरात बुधवारी (दि. १८) पहाटे घडली.

याप्रकरणी वानवडी पोलिसांनी पाच जणांवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. रुपेश धनराज शिंदे (वय १९, रा. मोशी, पिंपरी- चिंचवड) असे मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याचे वडील धनराज बळीराम शिंदे (वय ४५) यांनी वानवडी पोलिसांत फिर्याद दिली आहे.

# पुण्यात महाराष्ट्र केसरी स्पर्धेची धूम; सुनेत्रा पवार यांचे मल्लांना मार्गदर्शन

पुणे: राज्याला कुस्तीची मोठी परंपरा आहे. याच कुस्तीने देशाला पहिले पदक मिळवून दिले. कुस्तीचा वारसा पुढे सुरू ठेवण्याचे काम सर्वांनी करायचे आहे. अशा स्पर्धेतून अनेक मल्ल घडले आहेत. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी दादांनी नेहमीच पुढाकार घेतला होता. विशेषतः त्यांचे कुस्तीवर विशेष प्रेम होते. क्रीडा क्षेत्राला वेगळी झळाळी दादांनी मिळवून दिली होती. मल्ल हा शिस्त आणि प्रामाणिक असतो.

स्पर्धेच्या आखाड्यात मल्लांनी आपला प्रामाणिकपणा दाखवून राज्याचे नाव उज्ज्वल करावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने आणि रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने आयोजित ६८ व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आयोजक रामकृष्ण सातव पाटील, महापौर



मंजुषा नागपुरे, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, सरचिटणीस योगेश दोडके, कार्याध्यक्ष संदीप भोंडवे, महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक असोसिएशनचे सचिव संजय शेटे, आमदार ज्ञानेश्वर कटके, प्रदीप कंद, मोनिका मोहोळ, प्रियांका सातव, ऑलिम्पियन मारुती आडकर यांसह विविध महाराष्ट्र केसरी विजेते, मल्ल उपस्थित होते.

यावेळी साक्षी इंगळे या खेळाडूचा सन्मान करण्यात आला. सातव म्हणाले, या स्पर्धेत नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यात आली असून, मातृशक्तीला मानवंदना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी महिला फारशा येत नाहीत. परंतु, त्यांना या कुस्त्या पाहता याव्यात म्हणून त्यांच्यासाठी स्वतंत्र गॅलरी ठेवली आहे. त्यातून नवीन मल्ल कुस्तीला मिळतील. कुस्तीचा आवाका वाढवा तसेच गॅल्यामर मिळावे, या हेतूने हे आयोजन केले आहे. तडस म्हणाले, या स्पर्धेतून विजेता स्पर्धक राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होतो हा इतिहास आहे. महाराष्ट्र केसरी ही एकच होणार असून बाकीच्या स्पर्धा अनधिकृत आहेत. कुस्तीला ऑलिम्पिक स्पर्धेत पुन्हा पदक मिळावे, यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे.

महाराष्ट्र केसरी कुस्तीवर फक्त अवलंबून राहू नका, तर महाराष्ट्राच्या मल्लाने राष्ट्रीय, आशियाई आणि राष्ट्रकुल स्पर्धेच्या माध्यमातून ऑलिम्पिकपर्यंत पोहोचावे. स्व. अजित पवारांनी क्रीडा क्षेत्राला पुढे आणण्याचे आणि या विभागाला सुगीचे दिवस आणण्याचे काम केले आहे. नागपुरे म्हणाल्या, आजचा सोहळा महिलांच्या सन्मानाचा आहे. महाराष्ट्र केसरी कुस्तीची परंपरा आजही जपत आहोत. केवळ स्पर्धा नसून खेळाडूंचा शक्तीचा ही आदर आहे. त्याचबरोबर इतर स्पर्धा आयोजित करून तरुणाईला आकर्षिक करण्याचा चांगला उपक्रम घेतला आहे. यावेळी प्रदीप कंद, ज्ञानेश्वर कटके यांनी ही मनोगत व्यक्त केले. रामभाऊ दाभाडे यांनी आभार मानले.

# शिरुर तालुक्यात १२ वर्षीय मुलाचा खून; २१ महिन्यांपूर्वीच्या घटनेशी साम्य

पुणे । प्रतिनिधी

तळेगाव ढमढेरे: दहिवडी (ता. शिरूर) येथील मांजरेवस्ती येथे १२ वर्षीय मुलाचा खून झाल्याची घटना मंगळवारी (दि. १७) घडली. साईराज गणेश मांजरे असे खून झालेल्या बालकाचे नाव आहे. शिक्रापूर पोलिसांनी याप्रकरणी अक्षय दत्तात्रय मांजरे (वय २२, रा. मांजरेवस्ती, दहिवडी, ता. शिरूर) याला अटक केली आहे. शिक्रापूर पोलिस ठाण्यात याबाबत गणेश जयसिंग मांजरे (वय ३८, रा. मांजरेवस्ती, दहिवडी, ता. शिरूर) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दहिवडी (ता. शिरूर) येथील साईराज गणेश मांजरे हा १२ वर्षीय बालक मंगळवारी (दि. १७) दुपारी घरातून गेला. मात्र, पुन्हा घरी न आल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला असता घरापासून काही अंतरावर साईराजचा मृतदेह मिळाला. घटनेची माहिती मिळताच शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, पोलिस निरीक्षक दीपरतन गायकवाड, शिरूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी निळकंठ गव्हाणे यांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, काही दिवसांपूर्वी यश गायकवाडचा देखील अशाच पद्धतीने मृत्यू झाला होता व त्याचे कारण समोर आले नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

दरम्यान, पोलिसांनी ही घटना वन विभागाच्या माथी मारल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला असून, या प्रकरणात खुनाचा गुन्हा नोंद करा, तेव्हाच आम्ही मृतदेह हलवू, अशी आक्रमक भूमिका घेतल्याने पोलिसांनी स्थानिकांचा रोष लक्षात घेत घटनास्थळीच फिर्याद घेत अज्ञातावर खुनाचा गुन्हा दाखल केला. दरम्यान, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व शिक्रापूर पोलिस घटनेचा तपास करीत असताना पोलिसांना संशयित अक्षय मांजरे याच्याबाबत माहिती मिळाली. पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर व पोलिसी खाक्या दाखविल्यावर त्याने हा खून केल्याची कबुली दिली. पोलिसांनी अक्षय दत्तात्रय मांजरे याला अटक केली आहे.

...तर यशला देखील मिळाला असता न्याय

दहिवडी येथील साईराज मांजरे याच्या घटनेचे गांभीर्य ओळखून शिक्रापूर पोलिसांनी घटनेचा छडा लावला. त्याचप्रकारे २१ महिन्यांपूर्वी यश गायकवाडच्या प्रकरणाचे तत्कालीन तपासी अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक केशव वाबळे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तपास केला असता, तर यश गायकवाडला देखील न्याय मिळाला असता, अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

नागरिकांचे ठिय्या आंदोलन

दहिवडी येथील यश गायकवाड व साईराज मांजरे या दोघांचे मृतदेह एकाच ठिकाणी, एकाच विहिरीजवळ, एकाच ठरावीक वेळेत, तर दोघांच्याही डोळ्यालाच जखम, अशा अवस्थेत मिळून आले. यश गायकवाडचा मृतदेह बिबट्याच्या हल्ल्यात झाल्याचे बोलले गेले. मात्र, तसा अहवाल प्राप्त झाला नाही. आज देखील बिबटहल्ल्याचा संशय व्यक्त केला जात असताना स्थानिकांनी आक्रमक भूमिका घेत हा गुन्हा वन विभागात घेऊच नका, अशी मागणी करीत ठिय्या मांडला होता.

तब्बल २१ महिन्यांपूर्वीच्या घटनेला उजाळा

विशेष म्हणजे, २१ महिन्यांपूर्वी २१ जून २०२४ रोजी यश गायकवाड या बालकाचा डोक्यावर जखम असलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आलेला असताना त्याच ठिकाणी त्याच शेतात व त्याच विहिरीच्या कडेला त्याच पद्धतीने डोक्यावर जखम असलेल्या अवस्थेत खून झालेल्या बालकाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.